महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०
संपर्क क्रमांक (०२०) २४४७ ६९३८ E-mail: itdept@maa.ac.in


जा.क्र. राशैसंप्रपम /आय.टी./शैक्ष. कार्य. अंमलबजावणी /२०२२/९७० दिनांक: २४ फेब्रुवारी, २०२२.

# परिपत्रक

प्रति,

१. जिल्हाधिकारी (सर्व),
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३. आयुक्त, महानगर पालिका (सर्व).

**विषय :- शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही शैक्षणिक उपक्रम/ प्रशिक्षणे/ प्रकल्प/सर्वेक्षण आदी. कार्यक्रम न राबविणेबाबत...**

**संदर्भ :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९.
२. महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. २९ जानेवारी २०१४.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. २२ जून २०१५.
५. शासन परिपत्रक क्र. एसएसए २०१६/ प्र. क्र.६/ एस डी १ दिनांक ०१/०१/२०१६.
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. १७ ऑक्टोबर २०१६.
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. ०८ जून २०१७.
८. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा. क्र. अशिका/२०२०/ प्रशिक्षण धोरण/ आस्था क्र.१४३ दिनांक ०९/०४/२०२०.
९. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय दि. २८ एप्रिल २०२०.
१०. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०.
११. माहिती तंत्रज्ञान कायदा २०००.
१२. शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे यांच्या दि. २३ डिसेंबर २०२१ च्या मार्गदर्शक सूचना.

उपरोक्त संदर्भीय क्र. १ नुसार राज्यात सन २०१० पासून शिक्षण हक्क अधिनियम, २००९ अंमलात आला आहे .त्यानुसार राज्यातील १००% मुले शिकण्याच्या दृष्टीने इयत्ता १ ली ते ८ वी तसेच इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे शिक्षण सुलभ व्हावे या हेतूने शासन पातळीवर विविध निर्णय घेण्यात आले आहेत. **जसे की, १-** राज्यात उपरोक्त संदर्भीय क्र. १ व २ तील कलम २९ नुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे संस्थेस **"विद्या प्राधिकरण"** म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

**जसे की, २-** शिक्षण हक्क कायद्याच्या तरतुदीप्रमाणे उपरोक्त संदर्भीय क्र. ३ नूसार सर्व प्रकारच्या प्रशिक्षणांसाठी राज्यस्तरावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे संस्था "विद्या परिषद" म्हणून राज्यातील प्रशिक्षणाची **"शिखर संस्था"** व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना अनुक्रमे प्रशिक्षणाच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय **"शिखर संस्था"** म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

तसेच संदर्भीय क्र. ६ शासन निर्णयान्वये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या पुनर्रचितही करण्यात आलेल्या आहेत. या सर्व निर्णयांमुळे विभागातील प्रत्येक कृतीचा सकारात्मक परिणाम मुलांच्या शिकण्यात होत आहे.

उपरोक्त संदर्भीय क्र. ७ नूसार राज्यस्तरावरील तसेच जिल्हा स्तरावरील संस्थांना प्रशिक्षणाबद्दल पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या ही स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. १ तील कलम २९ तसेच संदर्भ क्र. २ तील कलम २९ (५) नुसार राज्यातील शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा यांना सक्षम करण्यासाठी राज्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे यांनी प्रशिक्षण देणे, विविध कार्यक्रम विकसित करणे, विविध स्तरावर तज्ज्ञ गट स्थापन करणे तसेच सर्व प्रकारच्या प्रशिक्षणाचे मूल्यमापन करणे याबाबत निर्देशित करण्यात आलेले आहे. तसेच स्थानिक प्राधिकरण, जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय संस्थांनी कोणत्याही प्रकारचे उपक्रम, प्रशिक्षण शासनाच्या मान्यतेशिवाय घेवू नयेत, असे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत.

तरी शासनाच्या असे निर्दशनात आले आहे की,

१) काही अधिकारी/ त्रयस्थ व्यक्ती/ खाजगी संस्था/ अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO)/ लोकप्रतिनिधी व्यक्तिगत पातळीवर संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका वा इतर वरिष्ठ अधिकारी यांचेशी परस्पर संपर्क करून, शासनाची कोणतीही मान्यता न घेता परस्पर विद्यार्थी/ शिक्षक/ क्षेत्रीय अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण/ उपक्रम/ प्रकल्प/ सर्वेक्षण आदी. कार्यक्रमांचे आयोजन करत आहेत. असे कार्यक्रम करण्यामागे कधी व्यावसायिक प्रेरणा असते तर कधी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा सद्हेतू असू शकतो . मात्र अशा परस्पर आयोजित कार्यक्रमांमधून शिक्षक आणि विद्यार्थांचा गोंधळ उडतो, तसेच राज्यपातळीवरील, विभागपातळीवरील किंवा जिल्हापातळीवरील नियोजन ढासळते.

२) अश्या प्रकारच्या प्रशिक्षणात शिक्षक वारंवार उपस्थित राहणे, सतत वर्गाबाहेर असणे, विद्यार्थ्यांशी संपर्क कमी होणे यामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होवून विद्यार्थी ठराविक काळात शिक्षक मार्गदर्शनापासून वंचित राहतांना आढळत आहेत.

३) उदा. समजा एक शिक्षक ३० विद्यार्थी संख्या असलेल्या एका वर्गात सरासरी ०६ तास विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करीत असतो. त्यामुळे ०१ दिवसाला ३० विद्यार्थी * ६ तास = १८० **मनुष्य तास/ कार्यालयीन तास** अध्ययन अध्यापन प्रक्रिया घडत असते. जर तो शिक्षक बाह्य संस्थांमार्फत आयोजित प्रशिक्षणाला समजा ०२ दिवस आपल्या वर्गाबाहेर असल्यास ०२ दिवस * ३० विद्यार्थी * ६ तास = **३६० मनुष्य तास / कार्यालयीन तास विद्यार्थ्यांचे अध्ययन- अध्यापनाचे नुकसान होते.** अश्या प्रकारे शिक्षक जितके दिवस वर्गाबाहेर असेल; तितके तास विद्यार्थ्यांचे अध्ययन-अध्यापन नुकसान होत असते.

४) काही संस्था, अधिकारी शासनाच्या परवानगी शिवाय शिक्षकांना खाजगी संस्था/ अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO)/ एज्यु-टेक अर्थात तंत्रज्ञानाधारित शिक्षण- संस्थांनी ऑनलाइन पद्धतीने विकसित केलेले विविध मोबाईल ॲप, पोर्टल, संकेतस्थळे यावरील जतन केलेले पाठ, व्हिडीओ, अभ्यासक्रम, ट्यूटोरियल्स, स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम वापरण्यासाठी अथवा या संस्थांसाठी ई-साहित्य तयार करण्यासाठी आवाहन तसेच अनौपचारिक सक्ती करत आहेत अथवा शिक्षकांच्या सेवा यासाठी वापरत आहेत.

५) त्यात विद्यार्थी/ शिक्षक/ पदाधिकारी/ क्षेत्रीय अधिकारी शासनाच्या परवानगी शिवाय सहभागी होत आहेत, सदर बाब बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९ नुसार आक्षेपार्ह आहे.

उपरोक्त संदर्भीय क्र. ७ नूसार प्रशिक्षण कार्यक्रमांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिकण्याची पातळी वाढविण्यासाठी तसेच विद्यार्थी अयशस्वी होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी असला पाहिजे. यासाठी प्रत्येक प्रशिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी व मूल्यमापन करतांना प्रशिक्षणाची आवश्यकता, प्रशिक्षणाची **'स्मार्ट' (SMART- Specific, Measurable, Authentic, Realistic, Time bound)** उद्दिष्टे, प्रशिक्षण घटकसंच विकसन, दर्जेदारपणा, प्रशिक्षणाचे सनियंत्रण व पर्यवेक्षण, फलनिष्पत्ती मोजणे, तसेच प्रशिक्षणाची परिणामकारकता तपासणे इ. बाबी पूर्ण आवश्यक असते, हे आपणास विदितच आहे. **याकरिता उपरोक्त संदर्भ क्र. ७ शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ प्रशिक्षणांना मान्यता देण्याचा अधिकार अंतर्गत उपमूद्दा ४.१ ते ४.५ अंतर्गत महत्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत,**

४.१ यापुढे घेण्यात येणाऱ्या सर्व प्रशिक्षणे वरील प्रक्रियेनुसार अमलात येतील. ही प्रक्रिया पाळली जाईल हे पाहण्याची जबाबदारी विद्या प्राधिकरण (सध्याचे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे) यांची असेल.

४.३ यापुढे जिल्हा, तालुका, बीट व केंद्र विविध प्रशिक्षणे विद्या प्राधिकरण, पुणे तसेच त्यांच्या संलग्नित संस्था (प्रादेशिक विद्या प्राधिकरणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) यांच्या मान्यतेने करता येतील. **विद्या प्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय कोणतेही प्रशिक्षण करण्यात येऊ नये.**

**४.५ अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत शाळांमध्ये प्रशिक्षण घ्यावयाचे असल्यास अशा प्रशिक्षण कार्यक्रमांना शासनाची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.**

त्यामुळे कोणत्याही अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO) यांनी शासनाच्या परवानगीशिवाय कोणतेही कार्यक्रम, प्रशिक्षणे, उपक्रम, सर्वेक्षण आदी. वेगवेगळे उपक्रम करू नये हे स्पष्ट होते.

उपरोक्त संदर्भ क्र. १० चे मार्गदर्शक सुचनातील भाग १ शालेय शिक्षण अंतर्गत प्रकरण ५- शिक्षक मधील उपमुद्दा सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास (CPD) ५.१५ मध्ये स्पष्ट तरतूद केली आहे की, स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी, व्यावसायिक विकासात प्रगती करण्यासाठी शासनामार्फत आयोजित स्थानिक, प्रादेशिक, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळाद्वारे दरवर्षी किमान ५० तासांसाठी CPD च्या संधी मध्ये सहभागी व्हावे; जेणेकरून त्याचा फायदा पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, अध्ययन निष्पत्ती वाढ, क्षमता धारित अध्ययन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनासाठी होईल.

केंद्र व राज्य शासनाने प्रकाशित केलेल्या माहिती तंत्रज्ञान कायदा २००० व शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे यांच्या दि. २३ डिसेंबर २०२१ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार शाळांनी/संस्थांनी/अधिकाऱ्यांनी ई-साहित्य वापरतांना देखील ते नेमके कोणासाठी? कोणत्या वयोगटासाठी वापरले जात आहे? हे पाहणे गरजेचे आहे. कारण आपले सर्व ई- साहित्य मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी, शिक्षक व पालक वापरत असतात. अश्यावेळी बाह्य संस्थांचे ई- साहित्य वापरतांना अनेकदा व्यावसायिक संकेत स्थळे, आशय, जाहिराती अथवा व्यक्तींचे संपर्क होतांना दिसून येतात (संदर्भ क्र. १२). त्याचा परिणाम वापरकर्त्याची वैयक्तिक माहितीचा (मोबाईल क्र., ई-मेल, बँक खाते इ.) वापर करून नंतर आर्थिक, मानसिक, सामाजिक स्वरूपाच्या फसवणूकीमध्ये होत असतो (संदर्भ क्र. १२). तसेच विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्या वैयक्तिक माहितीच्या सुरक्षिततेसंदर्भात साशंकता निर्माण होते(संदर्भ क्र. १२). अश्या प्रकारच्या घटना आपल्या कार्यक्षेत्रात घडल्यास त्यास जबाबदार कोण? या बाबी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. **त्यामुळे ई- साहित्य वापर करतांना अथवा वापरावयासाठी देतांना वापरकर्त्याची गोपनीयता हा मुलभूत व सर्वोच्च अधिकार आहे हे लक्षात घेणेसाठी आपले लक्ष संदर्भ क्र. १२**

**<u>कडे जाणीवपूर्वक वेधण्यात येत आहे.</u>** (आपल्या अवलोकनार्थ सोबत संदर्भीत मार्गदर्शक सूचना जोडण्यात आलेले आहे)

यासाठी शासनाने उपरोक्त संदर्भीय क्र. ०९ नुसार शासनामार्फत मोफत उपलब्ध असणारे शैक्षणिक तंत्रज्ञानाची विविध साधने वापरण्यासाठी आदेशित केलेली आहेत. उदा. दीक्षा, स्वयं, स्वयं प्रभा इ. तरी आपण आपल्या अधिनस्थ सर्व यंत्रणांना सदर मोफत शैक्षणिक साधने वापरण्यासाठीच्या सूचना देणेत याव्यात.

यास्तव शिक्षण हक्क कायदा २००९, कलम २९ नूसार **<u>"विद्या परिषद प्रमुख"</u>** या नात्याने मी पुढीलप्रमाणे महत्वाच्या बाबी आपल्या निदर्शनास आणून देत आहेत,

१. राज्यातील सर्व विद्यार्थी/ शिक्षक/ क्षेत्रीय अधिकारी यांची प्रशिक्षणे ही शासनाच्या ध्येय धोरणानुसार व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार होणे गरजेचे आहे.

२. त्यामध्ये सुसंगतता व एकवाक्यता येण्याच्या दृष्टीने यापुढे विद्यार्थी/ शिक्षक/ क्षेत्रीय अधिकारी यांनी (औपचारिक) प्रशिक्षणे/ उपक्रम/ प्रकल्प/ सर्वेक्षण आदी. कार्यक्रमांत शासनाच्या किंवा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे **<u>(प्रशिक्षणाची राज्यस्तरीय शिखर संस्था)</u>**/ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था **<u>(प्रशिक्षणाची जिल्हा स्तरीय शिखर संस्था)</u>** यांच्या मान्यतेशिवाय उपस्थित राहू नये.

३. मुंबई जिल्ह्यासाठी उपरोक्त जबाबदारी उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत पार पाडण्यात यावी.

४. कोणत्याची अशासकीय स्वयंसेवी (NGO) संस्थांनी ऑनलाइन पद्धतीने विकसित केलेले विविध मोबाईल ॲप, पोर्टल, संकेतस्थळे यावरील जतन केलेले पाठ, व्हिडीओ, अभ्यासक्रम, ट्यूटोरियल्स, स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन कार्यक्रम **<u>शासनाच्या परवानगीशिवाय</u>** शाळांमध्ये वापरू नये तसेच कोणत्याची संस्था, व्यक्ती, अधिकारी यांची शिफारस **<u>शासनाच्या परवानगीशिवाय</u>** क्षेत्रीय यंत्रणेस करू नये.

५. ई- साहित्य वापर करतांना अथवा वापरावयासाठी देतांना वापरकर्त्याची गोपनीयता हा मुलभूत व सर्वोच्च अधिकार आहे, हे लक्षात ठेवावे.

६. आपल्या अधिनस्त क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत सर्व पालकांना ई- साहित्य ऑनलाईन/ ऑफलाईन स्वरुपात वापरण्याबाबत वरील सूचना निर्देशनास आणून द्याव्यात तसेच आवाहन करण्यात यावे.

७. कोणत्याही अशासकीय स्वयंसेवी (NGO) संस्थेस प्रशिक्षणे/ उपक्रम/ प्रकल्प/ सर्वेक्षण आदी. कार्यक्रमांचे आयोजन करावयाचे असल्यास त्यांनी संबंधित जिल्ह्यातील प्रादेशिक विद्या प्राधिकरण अथवा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेशी संपर्क करून पडताळणी व तपासणी करून घ्यावेत.

८. तसेच संबंधित जिल्ह्यातील संचालक/उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण अथवा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे स्वयंस्पष्ट शिफारशी जोडूनच कार्यक्रमांचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करावयास सांगण्यात यावे.

९. संबंधित जिल्ह्यातील संचालक/उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण अथवा प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अथवा संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांचे स्वयंस्पष्ट शिफारशीशिवाय कोणत्याही प्रशिक्षणे/ उपक्रम/ प्रकल्प/ सर्वेक्षण आदी. कार्यक्रमांना शासनामार्फत मान्यता देण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

१०. यास्तव क्षेत्रीय स्तरावर होणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रशिक्षणे/ उपक्रम/ प्रकल्प/ सर्वेक्षण आदी. कार्यक्रमांना मंजुरी, नावनोंदणी, सनियंत्रण, पर्यवेक्षण तसेच अंतिम अहवाल विकसन यासाठी ऑनलाईन शिक्षक प्रशिक्षण प्रणाली विकसनाचे कामकाज या कार्यालयामार्फत कार्यान्वित करणेत येत आहे.

११. यासाठी कार्यक्रम मंजुरी नमुना अर्ज व इतर अनुषंगिक बाबी आपणास यथावकाश कळविल्या जातील.

शासनाच्या निर्देशानुसार सदर सूचनांचे पालन सर्व शिक्षक व क्षेत्रीय अधिकारी यांनी काटेकोरपणे करून शिक्षण हक्क कायदा २००९ चे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(**एम.डी.सिंह,** भा. प्र. से.)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.

**सोबत-**

१. संदर्भीय क्र. ३,६,७ व ९ शासन निर्णय.
२. संदर्भीय क्र. १२- शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे यांच्या दि. २३ डिसेंबर २०२१ च्या मार्गदर्शक सूचना.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

- मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
- संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
- संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत कार्यवाहीस्तव -**

- विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व) यांनी आपल्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय यंत्रणेस कार्यवाही करण्याबाबत योग्य ते आदेश देण्यात यावेत.
- उपसंचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण (सर्व).
- प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व).
- शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
- शिक्षणाधिकारी, प्राथमिक / माध्यमिक (सर्व), जिल्हा परिषद.
- प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी (म.न.पा./ न.पा./ न. प.) (सर्व).
- शिक्षण निरीक्षक, मुंबई (पश्चिम, दक्षिण, उत्तर).

**कोव्हीड १९ या विषाणुजन्य साथीच्या रोग प्रसारामुळे लागु करण्यात आलेल्या संचारबंदीच्या काळात अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी लर्नींग फ्रॉम होम ही संकल्पना राबवविणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८४/एस.डी.-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ एप्रिल, २०२०

**प्रस्तावना :**

सध्या देशभरामध्ये संचारबंदीची परिस्थिती आहे. जगभरातही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. अशा गंभीर परिस्थीतीत वाहतुकीचे प्रमाण कमी झाल्यामुळे, कारखाने बंद असल्यामुळे प्रदूषणाचे प्रमाणही खूप कमी झाले आहे. या परिस्थितीत विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पर्यावरणाप्रती अधिक सजग करता येऊ शकते. संचारबंदीच्या काळामध्ये पालक, मुले, सर्व कुटुंबीय घरातच बंदिस्त झाले आहेत. अशा काळात घर हेच एक प्रयोगशाळा बनवता येऊ शकेल का? घरातील वेगवेगळे साहित्य, स्वयंपाक घरातील वस्तू, त्यांची रचना व कार्य तसेच या वस्तूंच्यामागचे विज्ञान याबाबत मुलांमध्ये आपल्याला जागरूकता निर्माण करता येऊ शकते.

कोरोना (COVID-१९) विषाणूच्या जगभरातील वाढत्या प्रादुर्भावामुळे देशात व संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये राज्यातील सर्व शाळा महाविद्यालये बंद आहेत. शालेय स्तरावरील सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत राज्यात लागू करण्यात आलेली संचारबंदी पुढील कालावधीकरीता वाढविण्यात आली आहे. संचारबंदीच्या या काळात प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाच्या प्रवाहात असणे महत्त्वाचे आहे. या मुलांना अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेत ठेवण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे. संचारबंदीच्या या काळात मुलांच्या मनामध्ये असलेली भिती, चिंता दूर करण्याचा प्रयत्नही करणे आवश्यक आहे. हाती असलेल्या वेळेचा सदुपयोग करून काही नव्या गोष्टी करता येऊ शकतात. यासाठी तंत्रज्ञानाच्या या युगात ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे आता उपयुक्त ठरणार आहे. त्याआधारे मुलांना आता स्वयंअध्ययन करता येईल. सद्य:स्थितीत शालेय अभ्यासक्रमातील मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी, इतिहास व नागरीकशास्त्र, भूगोल, कला, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासाची आता नवीन दिशा ठरविता येईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये तंत्रज्ञानाचा वापर खूप चांगल्या प्रकारे वापरता येऊ शकेल.

मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी सध्या खूप वाव आहे. पालकांना मुलांचा कल, छंद, वृत्ती, दृष्टिकोन समजून घेण्यासाठी आपल्याला काही मदत करता येऊ शकेल का? त्यासाठी प्रश्नावली त्यांना पुरवता येऊ शकेल का? याचाही विचार करता येऊ शकतो. सध्या शालेय अभ्यासक्रम अध्ययन-अध्यापनाचे कार्य बंद असले तरी मुलांचे अध्ययन मात्र बंद नाही. ते सतत चालू असते. पण अभ्यासापलीकडच्या या अध्ययनाला शालेय अभ्यासाची जोड देता आली तर शिक्षण हे अधिक समृद्ध, सखोल आणि समजपूर्वक करता येऊ शकते. त्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाची मदत घेता येऊ शकेल का?

कोरोना (COVID-१९) या विषाणूच्या प्रसारामागील विज्ञान समजावून घेतलं तर असं लक्षात येतं की, हा विषाणू माणसांच्या सभा संपर्कामुळे (Community transfer) मोठ्या प्रमाणात प्रसारित होतो. त्यामुळे सध्या जगभरामध्ये अनिवार्य कामासाठी भेटणाऱ्या व्यक्ती एकमेकापासून अंतर ठेवून काम करत आहेत. एकमेकांना अभिवादन करण्याच्या पद्धतीतही बदल झाले आहेत. मोठ्या प्रमाणामध्ये भारतीय संस्कृतीतील अभिवादनाची पद्धती जगभरामध्ये वापरली जात आहे. या दृष्टिकोनातून भारतीय संस्कृतीला जगामध्ये एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीचा वारसा मुलांना समजावून सांगून त्याचे महत्त्व पटवून देण्याची ही योग्य वेळ आहे.

**<u>शासन परिपत्रक:-</u>**

महाराष्ट्र शासनाने या पूर्वीपासूनच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी उपाययोजना केलेल्या आहेत. त्या सर्व पालकांपर्यंत आणि मुलांपर्यंत पोहोचून आपले शिक्षण आपण या काळात सुद्धा चालू ठेवू शकतो. त्यासाठी वेगवेगळी संकेतस्थळे, पोर्टल, प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक एप्लिकेशन्स यांचा वापर शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी करावा. तंत्रज्ञानाचा वापर करताना सायबर सेक्युरिटी संदर्भातही विद्यार्थी आणि पालक यांचे सतत उद्बोधन होणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीमध्ये अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी काही महत्त्वाच्या संसाधनांची माहिती शासन सर्वांना करून देत आहे. त्यांचा अधिकाधिक वापर करण्याची आवश्यकता आहे.या करिता **घरी राहुन शिक्षण ( Learning From Home)** ही संकल्पना राबविण्यासाठी खालील संसाधनाची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. या संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करून लर्नींग फ्रॉम होम ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणावी.

**१. DIKSHA: प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी यांना मोफत आणि मुबलक प्रमाणात ई-लर्निंग साहित्य मिळावे म्हणून केंद्र शासन (MHRD) आणि महाराष्ट्र शासनाने DIKSHA ई-लर्निंग प्लॅटफॉर्म सुरु केला आहे.**

DIKSHA वर सद्य:स्थितीमध्ये इयत्ता १ ली ते १० वी साठी मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेमधील ९००० पेक्षा अधिक ई-लर्निंग साहित्य उपलब्ध आहे. या वर उपलब्ध ई-साहित्यामध्ये प्रामुख्याने इंटरॅक्टिव व्हिडिओ, संकल्पनेवर आधारित व्हिडिओ, उपक्रमावर आधारित व्हिडिओ, बौद्धिक खेळ स्वरुपातील गेम्स, विविध वर्कशिट, इंटरॅक्टिव प्रश्नपेढी इत्यादींचा समावेश आहे. महाराष्ट्रातील शिक्षकांनी देखील DISKHA वरील ई-साहित्याची निर्मिती केली आहे. DIKSHA वरील उपलब्ध ई-साहित्याचा वापर करून विद्यार्थी घरबसल्या आपले अध्ययन सुरू ठेवू शकतात तसेच पालक याचा वापर करून विद्यार्थ्यांचा अभ्यास घेऊ शकतात.

**अ. इयत्ता १ली ते १०वी साठीचे DIKSHA मोबाईल ॲप :** इयत्ता १ली ते १०वी च्या राज्य शासनाच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येक पाठ्यपुस्तकामध्ये Q.R. Code देण्यात आले आहेत. या Q.R. Code ला शिक्षकांमार्फत तयार करण्यात आलेले ई-लर्निंग साहित्य जोडलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी काही स्वयं अध्ययनावर आधारित उपक्रमांचा समावेश देखील करण्यात आलेला आहे. हे सर्व साहित्य पाठयपुस्तकातील QR कोड DIKSHA ॲप वापरून स्कॅन केल्यावर सहज पाहता येणार आहे. तसेच पाठ्यपुस्तक नसल्यास सर्व साहित्य DIKSHA ॲप मध्ये सर्च व फिल्टर या पर्यायांचा वापर करून देखील पाहता येणार आहे. हे साहित्य ऑफलाईन वापरण्याची सुविधाही देण्यात आली आहे. DIKSHA ॲप डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा

https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app

**आ. इयत्ता १ ली ते १०वी साठीचे DIKSHA वेब पोर्टल :** संगणक व लॅपटॉप वर देखील DIKSHA मधील ई-साहित्य पाहण्यासाठी DIKSHA वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे. यात इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व विषयांचे ई-साहित्य पाहता येते. DIKSHA वेब पोर्टल वर ई-साहित्य पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.

www.diksha.gov.in/explore

**इ. क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल थिंकिंग (सीसीटी) प्रश्न :** इयत्ता आठवी-दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन, गणित आणि विज्ञान साक्षरतेवरील CCT आठवड्यातून DIKSHA वर अपलोड केल्या जातात. CCT सरावासाठी नवीन प्रश्न दर सोमवारी अपलोड केले जातात आणि गुरुवारी उत्तरे दिली जातात, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचार कौशल्य निर्माण करण्याची चांगली संधी उपलब्ध होते. हे प्रश्न बघण्यासाठी खालील URL चा वापर करावा. CCT मार्फत सदर उपक्रम इतर इयतांसाठी लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

https://diksha.gov.in/resources/play/collection/do_312906088505204736123338?contentType=TextBook

**२. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' :** पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता १ ली ते १२ वी च्या राज्य अभ्यासक्रमावर आधारीत पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात येते. यास अनुसरून खालीलप्रमाणे अध्ययन साहित्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**अ. ऑनलाईन पाठ्यपुस्तके:** इ.१ ली ते १२ वी साठीची सर्व पाठ्यपुस्तके डाऊनलोड करण्यासाठी बालभारती वेबसाईट - www.ebalbharati.in या संकेतस्थळावर जाऊन PDF BOOKS DOWNLOADING मधून इयत्ता १ ली ते १० वीची राज्य अभ्यासक्रमावरील एकूण दहा भाषा माध्यामातील पाठ्यपुस्तके PDF स्वरूपात डाऊनलोड करावी. तसेच इयत्ता ११ वी व १२ वी ची मराठी आणि इंग्रजी या भाषा माध्यमातील PDF स्वरूपातील पाठ्यपुस्तके डाऊनलोड करावी. पाठ्यपुस्तके डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंकचा वापर करता येईल.

www.ebalbharati.in

http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook12.aspx

**आ. ई-बालभारती :** पाठ्यपुस्तक मंडळाने ई- बालभारतीच्या माध्यमातून **इयत्ता दहावीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमातील सर्व विषयांचे ई - लर्निंग साहित्य** तयार करण्यात आलेले आहे. या साहित्यामध्ये प्रत्येक पाठाचे व्हिडीओ ॲनिमेशनसह देण्यात आले आहेत. पाठावर आधारीत स्वाध्याय, प्रश्नेपेढी व काही कृती देण्यात आल्या आहेत. हे साहित्य ई-बालभारतीच्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. सदर साहित्य डाऊनलोड करून ऑफलाईन स्वरूपात वापरता येते. यासाठी पुढील लिंकचा वापरावी. https://learn.ebalbharati.in/

https://play.google.com/store.apps.details?id=com.EBalBharati

**इ. बोलकी बालभारती (Talking Books) :** ई- बालभारतीच्या माध्यमातून इयत्ता ८ वी ते १० वी च्या दिव्यांग (दृष्टी संदर्भात ) तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी मराठी व इंग्रजी माध्यमाची सर्व भाषा विषयांची Talking Books तयार करण्यात आली आहेत. ती ऑडीओ स्वरूपात असल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे श्रवण करता येईल. त्यासाठी पुढील लिंक वापरावी. https://learn.ebalbharati.in/

**ई. इयत्ता ८ वी ते १० वी विज्ञान, भूगोल, संस्कृत विषयाचे व्हिडीओ स्वरूपातील साहित्य :** बालभारतीने पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मदतीने संयुक्तरीत्या इयत्ता ८ वी ते १० वी विज्ञान , भूगोल , संस्कृत विषयाचे व्हिडीओ स्वरूपातील साहित्य तयार करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यानुसार विषयनिहाय पाठांच्या सादरीकरणाचे व्हिडीओ, प्रात्यक्षिक

कार्याचे व्हिडीओ अशा स्वरुपाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी खालील लिंक वापराव्यात.

www.youtube.com/user/ERCJPP ,

www.diksha.janaprabodhini.org

https://learn.ebalbharati.in/

**https:**//www.youtube.com/channel/UYCacnAJUq6dkmYrvb401cRA

**उ. बालभारती YouTube वाहिनी :** पाठ्यपुस्तक मंडळाने यु ट्यूब वाहिनी सुरू केलेली आहे. यामध्ये इयत्ता ८ वी ते १० वी चे विज्ञान, भूगोल आणि संस्कृत विषयांचे पाठनिहाय संकल्पना, घटक , उपघटक व प्रात्यक्षिक कार्य संदर्भातील व्हिडीओ उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. याशिवाय इयत्ता ११ च्या अभ्यासक्रमाचे संदर्भात विद्यार्थी, शिक्षक यांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रिया कशी अवलंबवावी याबाबतची माहिती देणारे अभ्यासमंडळ तज्ज्ञांचे व्हिडीओ उपलब्ध करून दिले आहेत. त्यासाठी खालील लिंक चा वापर करावा.

https://www.youtube.com/channel/UYCacnAJUq6dkmYrvb401cRA

**ए. पाठ्यपुस्तक मंडळाचे ई-बालभारती ॲप :** Google play Store मधून **ebalbharati App** डाऊनलोड करावे. यावर आपले खाते उघडण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. सदर ई-बालभारती ॲपवर ऑडिओ-व्हिडिओ इंटॅरॅक्टिव्ह स्वरूपातील साहित्य उपलब्ध आहे. सदर साहित्य एकदाच डाऊनलोड करून ते पुन्हा पुन्हा ऑफलाईन वापरण्याची सोय आहे.

https://play.google.com/store.apps.details?id=com.EBalBharati

**ऐ. किशोर मासिक :** पाठ्यपुस्तक मंडळामार्फत किशोर मासिक तयार करण्यात येते. १९७१ पासून ते चालू महिन्यापर्यंतचे असे ४९ वर्षातील सर्व अंक आता ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांना बालभारतीच्या संकेतस्थळावर PDF स्वरूपात अवांतर वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यासाठी http://kishor.ebalbharati.in/Archive/ लिंकचा वापर करावा.

### ३. अवांतर वाचनासाठीची वेबसाईट व ॲप्लीकेशन

**Bolo: वाचनासाठी चे मोबाईल ॲप्लीकेशन :** Google द्वारा निर्मित Bolo हे ॲप्लीकेशन मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. त्या संदर्भातील लिंक पुढीलप्रमाणे आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.seekh

४. **NROER: इ.१ ली ते १२ वी साठीच्या सर्व विषयांसाठी ई-साहित्य संग्रह :** राष्ट्रीय पातळीवर इ.१ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेले सर्व ओपन सोर्स इ-साहित्य नॅशनल रीपॉझिटरी ऑफ ओपन एज्युकेशनल रीसोर्सेस येथे उपलब्ध आहेत. NROER मध्ये विविध भाषेतील ई साहित्य उपलब्ध आहे. यासाठी खालील URL चा वापर करावा.

http://nroer.gov.in/welcome

**५. e -Pathshala :** NCERT ने इयत्ता १ ली ते १० वी साठी विविध प्रकारचे ई साहित्य वर विविध भाषेत अपलोड केली आहेत. यासाठी खालील URL चा वापर करावा.

http://epathshala.nic.in

http://epathshala.gov.in

**६. SWAYAM:** हा राष्ट्रीय ऑनलाईन शैक्षणिक प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये शालेय शिक्षणाशी संबंधित (इयत्ता नववी-बारावी) आणि उच्च शिक्षण (पदवीधर आणि पदव्युत्तर कार्यक्रमांतर्गत) चे १९०० ऑनलाईन अभ्यासक्रम देण्यात आले आहेत. यासाठी खालील URL वापरावे.

https://swayam.gov.in

**७. SWAYAM PRABHA:** यामध्ये शैक्षणिक सामग्री २४/७ प्रसारित करणारे ३२ डीटीएच टीव्ही चॅनेल आहेत. डीडी, फ्री डिश सेट टॉप बॉक्स आणि एन्टीना वापरून हे चॅनेल देशभरात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. चॅनेलचे वेळापत्रक आणि इतर तपशील पोर्टलवर उपलब्ध आहेत. या चॅनेलमध्ये शालेय शिक्षण (इयत्ता नववी-बारावी) आणि उच्च शिक्षण (पदवीधर आणि पदव्युत्तर कार्यक्रमांतर्गत) या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. यासाठी खालील URL वापरावे. तसेच या अंतर्गत NCERT चे किशोर मंच २४x७ टीव्ही चॅनेल साठी चॅनेल ३१ वर भेट देता येईल.

https://swayamprabha.gov.in

**८. PODCAST:** CBSE ने एक पॉडकास्ट ॲप 'सीबीएसई-शिक्षा वाणी' लॉन्च केले असून हे ॲंड्रॉइड फोन वापरकर्त्यांसाठी Google Play Store वर उपलब्ध आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापकांना पॉडकास्टद्वारे महत्त्वपूर्ण माहिती प्रसारित करण्यासाठी, याचा उपयोग होतो. स्टोरी टेलिंग पासून ते विविध शैक्षणिक व कौशल्याधारित विषयांपर्यंत तज्ज्ञांद्वारे विविध विषयांवर ऑडिओ फाइल तयार करणे यामुळे शक्य झाले आहे.

**९. National Digital Library of India: :** विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या भाषांमधील ८०००० पुस्तके ई - बुक स्वरूपात या वेबसाईट वर उपलब्ध आहेत. नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया ही

शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शिक्षक, विद्यार्थी, व्याख्याते, विद्यार्थी आणि शिकण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकासाठी व्यासपीठ आहे. यासाठी https://ndl.iitkgp.ac.in/ हे URL वापरा

**१०. विज्ञान विषयासाठी सिम्युलेशन मोबाईल ॲप्लीकेशन** - PhET विज्ञान विषयातील विविध प्रयोग आभासी प्रयोगशाळेच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी इंटरॅक्टीव्ह स्वरूपाचे ॲप खालील लिंकवर उपलब्ध आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=edu.colorado.phet.android_app

**११. Google Classroom:** शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रकल्प, गृहपाठ, अभ्यास, ई-साहित्य पुरवण्यासाठी मोबाईल ॲप्लीकेशन - Google Classroom. यानुसार अध्ययन साहित्याची देवाण घेवाण करण्यासाठी हा प्लॅटफॉर्म उपयुक्त आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.classroom

**१२. Google Hangouts:** विद्यार्थ्यांशी ऑडिओ किंवा व्हिडिओ कॉल ने संवाद साधण्यासाठी/अध्ययन - अध्यापनासाठी मोबाईल ॲप्लीकेशन - Google Hangouts. Google चे हे ॲप्लीकेशन शिक्षक - विद्यार्थी - पालक यांच्यात ऑडिओ किंवा व्हिडिओ स्वरूपात संवाद साधण्याचे उत्तम प्लॅटफॉर्म आहे. याकरिता पुढील लिंक वापरता येईल.

https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.meetings

**१३. ई-साहित्य उपलब्ध असलेला आंतरराष्ट्रीय संग्रह - Global Digital Library :** आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या देशांत बनवल्या गेलेल्या ओपन रिसोर्स व ई -साहित्याचा प्लॅटफॉर्म मोबाईल ऍप्लिकेशन स्वरूपात खालील लिंकवर उपलब्ध आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=io.digitallibrary.reader

१४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००५०४१५४७२१८१२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( राजेंद्र पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन,मुंबई

२) मा.अध्यक्ष, विधानसभा, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
३) मा.सभापती, विधानपरिषद, विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद,विधानभवन,मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
७) मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
८) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
९) सर्व मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, विधानभवन,मुंबई
१०) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मुंबई
११) मा.अपर मुख्य सचिव सचिव, शालेय शिक्षण विभाग
१२) आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा, चर्नी रोड, मुंबई
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, सर्व
१५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे
१८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१९) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ , पुणे
२०) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
२१) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व
२२) एन.आय.सी., पुणे
२३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका/कटक मंडळे सर्व
२४) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, सर्व
२५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने)
२६) निवडनस्ती (कार्यासन- एसडी-६)

"प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सुसंगत"
कार्यक्रम/उपक्रम/प्रशिक्षणाच्या आयोजनाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः एसएसए-२०१६/प्र.क्र. ६/एस.डी-१**
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०१ जानेवारी, २०१६

**संदर्भ -**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम दिनांक २२ जून, २०१५ चा शासन निर्णय

## शासन परिपत्रक -

"प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची" अंमलबजावणी दिनांक २२ जून, २०१५ च्या शासन निर्णयानुसार राज्यात जोमाने काम सुरु आहे. त्यामधील विचार व तत्वानुसार कार्य होणे आवश्यक आहे. समांतर कार्यक्रम व वेगळयाने उपक्रम घेण्यास प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत परवानगी नसतानाही अदयाप काही जिल्ह्यात उपक्रमाच्या नावाने वेगवेगळया गोष्टी सुरु आहेत. त्याची उद्दीष्टे स्पष्ट नाहीत. त्याचा मुलांच्या प्रत्यक्ष शिकण्याशी संबंध नाही.

२. शिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा, डायट व राज्यस्तरीय संस्थांमधील लोकांना मागणीशिवाय प्रशिक्षण देण्यास बंदी आहे. परंतु, अदयापही अश्या प्रकारच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये काही संस्था आर्थिक व तांत्रिक सहायता उपलब्धता करुन देतात. तसेच, अंदाजपत्रक व कार्ययोजनेत आर्थिक तरतूद मंजूर असल्याने त्याचा विनियोग करण्याच्यादृष्टीने अनाठायी प्रशिक्षणाचे आयोजन विविध स्तरावरुन केले जात आहे. त्याची उद्दिष्ट निश्चित नाहीत, परिणाम मिळत नाहीत, वेळेचा व निधीचा अपव्यय होत आहे आणि त्याचा थेट संबंध मुलांच्या शिकण्याशी नाही आणि उपयोगिता दिसून येत नाही.

३. यापुढे राज्यातील प्रत्येक मूल शिकेल यासाठीच समग्र कार्य होणार आहे. त्यानुषंगाने वरीलबाबी विचारात घेता सर्व स्थानिक प्राधिकरण, विभाग व राज्य स्तरीय संस्थांनी यापुढे कोणत्याही प्रकारचे उपक्रम, प्रशिक्षण शासनाच्या मान्यते शिवाय घेवू नयेत. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाची उद्दिष्ट विचारात घेवून त्याच्याशी सुसंगत अंदाजपत्रक व कार्ययोजना तयार करावी व ती शासनास मूल्यांकन व मान्यतेसाठी सादर करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०११६२१०४२२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(बी.आर.माळी)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**
मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

१) आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
४) शिक्षण संचालक (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग
९) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व)
१०) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर), जिल्हा परिषद (सर्व)
११) शिक्षण निरीक्षक (दक्षिण / उत्तर / पश्चिम), बृहन्मुंबई
१२) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
१३) निवड नस्ती (एस.डी.१)

**शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या परिणामांसाठी**
**प्रशिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : राप्रधो-४२१७/प्र.क्र.३२/२०१७/प्रशिक्षण**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक : ८ जून, २०१७**

**प्रस्तावना :**

राज्यात सन २०१० पासून शिक्षण हक्क अधिनियम, २००९ अंमलात आला आहे. त्यानुसार राज्यातील १००% मुले शिकण्याच्या दृष्टीने व १० व्या वर्गापर्यंत मुलींच्या गळतीचे प्रमाण ५% पेक्षा खाली आणण्याच्या हेतूने शासन पातळीवर विविध निर्णय घेण्यात आले आहेत. याकरिता दिनांक २२ जून, २०१५ पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम तर दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पासून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (माध्यमिक स्तर) हे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण हक्क कायद्याच्या तरतूदीप्रमाणे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये विद्याप्राधिकरण तसेच जिल्हा शैक्षणिक व्यवसाय सातत्यपूर्ण विकास संस्था (DIECPD) पुनर्रचित करण्यात आले आहेत. या सर्व निर्णयांमुळे विभागातील प्रत्येक कृतीचा परिणाम मुलांच्या शिकण्यात होतो हे पाहण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

पूर्वीपासून विभागांतर्गत घेण्यात येणारे प्रशिक्षण कार्यक्रम हे मुलांच्या शिकण्याची पातळी वाढविणे आणि विद्यार्थी नापास होण्याचे प्रमाण कमी करण्याच्या हेतूनेच करण्यात येत होते. परंतू प्रशिक्षणांचे उद्दिष्टे स्पष्ट असावीत तसेच प्रशिक्षणांचे मूल्यमापन व प्रशिक्षणाचे साध्य यासंदर्भात स्पष्टता आणणे गरजेचे होते. त्यानुसार विभागांतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षणांचे उद्दिष्ट स्पष्ट असणे, त्यांचे मापन करता येणे, प्रशिक्षण झाल्यावर ठराविक कालावधीत परिणाम मिळणे, पर्यवेक्षण व मूल्यमापनाच्या माध्यमातून परिणाम प्राप्त झाल्याचे पाहणे इत्यादी बाबत स्पष्टता आणण्यासाठी प्रशिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

शिक्षण विभागातील प्रत्येक प्रशिक्षणाचे नियोजन, अंमलबजावणी व मूल्यमापन करतांना कार्यपध्दती पुढीलप्रमाणे राहील :

**१. प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होणे : -**

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शैक्षणिक निकष, नॅशनल अचीव्हमेंट सर्वे (NAS), स्टेट लेवल अचीव्हमेंट सर्वे (SLAS) तसेच नामांकित स्वयंसेवी संस्था यांच्या द्वारे प्रकाशित होणारे अहवाल, क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या भेटी याद्वारे निश्चित होणाऱ्या गरजांमधून प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट होत असते. तसेच शाळा प्रगत करणे यासाठी सुध्दा प्रशिक्षणाची गरज भासू शकते. प्रशिक्षणाची आवश्यकता निश्चित झाल्यावरच प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात यावे.

## २. परिणामासाठी डिझाईन करणे :-

२.१ प्रशिक्षणाची आवश्यकता स्पष्ट झाल्यानंतर त्याचे उद्दिष्ट स्पष्ट करावे. उद्दिष्टे स्मार्ट (SMART- Specific, Measurable, Authentic, Realistic, Time bound ) स्वरुपाची असावीत.

२.२ वरीलप्रमाणे ठरविलेले उद्दिष्ट मुलांच्या विविध विषयांतील संपादणूक सुधरवण्याच्या दृष्टीने संपादणूकीत वाढ, विशिष्ट संकल्पनेच्या संपादणूकीत वाढ, प्रगत शाळांच्या संख्येत किंवा टक्केवारीत वाढ, नापास होण्याच्या प्रमाणात घट इत्यादी मापनात्मक भाषेत ठरविण्यात यावे.

२.३ अधिकांश सेवांतर्गत प्रशिक्षण कमी कालावधीचे असतात. अशा प्रशिक्षणांसाठी एकच विषयातील एकच संकल्पनेच्या संपादणूकीत वाढ असे ठरविण्यात यावे. जेणेकरुन परिणामाची पडताळणी करतांना मापन करण्यात कोणताही संभ्रम निर्माण होऊ नये.

२.४ प्रत्येक प्रशिक्षणाचे परिणाम प्रशिक्षणानंतर किती कालावधीत मिळतील हे देखील स्पष्ट करण्यात यावे.

२.५ वरील कालावधी संपल्यानंतर एक महिन्याच्या आत उद्दिष्ट प्राप्त झाले किंवा नाही या हेतूने प्रशिक्षणाचे मूल्यमापन करण्यात यावे. मूल्यमापन हे मुलांच्या संपादणूक पातळीची स्थिती पाहण्याविषयी राहील, त्याशिवाय इतर कोणत्याही बाबीने प्रशिक्षणाचे मूल्यमापन होणार नाही.

२.६ मूल्यमापनातील उद्दिष्ट प्राप्त झाले असल्यास प्रशिक्षण यशस्वी झाल्यास त्याच पध्दतीचे नियोजन व अंमलबजावणी पुढील उद्दिष्टांसाठी करावी. मात्र प्रशिक्षण परिणामकारक झाले नसल्यास त्याची कारणमीमांसा करुन प्रशिक्षणात दुरुस्ती करावी. व या दुरुस्तीस विद्याप्राधिकरणाच्या गाभा समितीची मान्यता घ्यावी.

## ३. प्रशिक्षणाच्या परिणामासाठी पर्यवेक्षण :-

३.१ प्रशिक्षणाचे परिणाम मुलांच्या शिकण्यात दिसण्याकरिता प्रभावी पर्यवेक्षण आवश्यक आहे. बऱ्याच वेळा शिक्षक किंवा कनिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाबाबत वरिष्ठांना प्रशिक्षणाच्या स्वरुपाविषयी कोणतीही माहिती नसते. यापुढे शिक्षकांना दिले जाणारे प्रत्येक प्रशिक्षण केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांना त्याच स्वरुपात देण्यात यावे. तसेच शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व DIECPD चे प्राचार्यांना सुध्दा प्रत्येक प्रशिक्षण संक्षिप्त स्वरुपात देण्यात यावे.

३.२ केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचे सुध्दा त्यांच्या वरिष्ठांना संक्षिप्त स्वरुपात प्रशिक्षण देण्यात यावे.

## ४. प्रशिक्षणांना मान्यता देण्याचा अधिकार :-

४.१ यापुढे घेण्यात येणारे सर्व प्रशिक्षण वरील प्रक्रियेनुसार अंमलात येईल. ही प्रक्रिया पाळली जाईल हे पाहण्याची जबाबदारी विद्याप्राधिकरणाची राहील.

४.२ सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, प्राथमिक संचालनालय, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, राज्य मंडळ यांच्याद्वारे काही प्रशिक्षण घ्यावयाचे झाल्यास त्यास सुकाणु समितीची मान्यता घेण्यात यावी. सुकाणु समितीने मान्यता देण्यापूर्वी वरील प्रक्रिया पूर्ण होत असल्याची खात्री करावी.

४.३ यापुढे जिल्हा, तालुका, बीट व केंद्र स्तरावर विविध प्रशिक्षण विद्याप्राधिकरणाच्या मान्यतेने करता येईल. विद्याप्राधिकरणाच्या मान्यतेशिवाय कोणतेही प्रशिक्षण करण्यात येऊ नये.

४.४ विभिन्न पातळीवर उद्‌भवणाऱ्या गरजा भागविण्यासाठी प्रशिक्षण घेण्याच्या उद्देशाने हे दिशानिर्देश देण्यात येत आहेत. क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या मनात उमगलेल्या गरजांचा यात समावेश आहे. मात्र पुढील नियोजित प्रक्रिया खरच गरज भागवेल हे तपासण्याची जबाबदारी विद्याप्राधिकरणाची राहील. क्षेत्रीय स्तरावरुन आलेला प्रस्ताव १५ दिवसांपेक्षा अधिक प्रलंबित राहणार नाही याची जबाबदारी संचालक, विद्याप्राधिकरणाची राहील. प्रस्तावांवर सत्वर विचार होईल या हेतूने विद्याप्राधिकरण पातळीवर विषयनिहाय गाभा समित्या तयार करण्यात याव्यात.

४.५ अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत शाळांमध्ये प्रशिक्षण घ्यावयाचे असल्यास अशा प्रशिक्षण कार्यक्रमांना शासनाची मंजूरी घेणे बंधनकारक राहील.

५. **प्रशिक्षक (Trainers) तयार करण्याचे तत्व :-** ज्यांनी संबंधित उद्दिष्टे साध्य करण्याकरिता प्रत्यक्ष काम केले आहे, त्यांनाच प्रशिक्षणात प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी देण्यात यावी. एखाद्या उद्दिष्टासाठी आधी प्रत्यक्ष काम केलेली व्यक्ती उपलब्ध नसल्यास आधी प्रायोगिक तत्वावर प्रशिक्षण राबवून तशी व्यक्ती तयार करण्यात यावी. त्यानंतर अशाच व्यक्ती प्रशिक्षक म्हणून कार्य करतील.

६. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांकरिता आवश्यक विषयांची प्रशिक्षणे सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान तसेच राज्य मंडळाकडे / विद्याप्राधिकरणाकडे प्रशिक्षणाकरिता उपलब्ध निधीतून करण्यात येतील. उच्च माध्यमिक शिक्षकांची प्रशिक्षणे राज्य मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात येतील.

७. प्रशिक्षणाच्या कालावधीत परिक्षा व Feedback घेण्यात यावा. Feedback साठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा प्रयत्न करावा.

८. ज्या विषयाचे प्रशिक्षण आयोजित केले आहे, त्या विषय शिक्षकांनाच सदर प्रशिक्षणासाठी शाळांनी पाठवावे. अन्य शिक्षकांना पाठविण्यात येवू नये. प्रशिक्षणासाठी शिक्षकाची निवड जबाबदारीने करावी.

९. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाअंती प्रमाणपत्र देण्यात यावे.

१०. प्रशिक्षणाचे स्वरुप ऑनलाईन आणि / अथवा प्रत्यक्ष (Face to Face) अशा स्वरुपाचे असावे.

११. प्रतिवर्षी शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने त्यासंदर्भातील स्वतंत्र गुणांकन (क्रेडिट) व्यवस्था निर्माण करण्यात येईल व संगणक प्रणालीमध्ये ते नोंदविण्यात येतील. शिक्षकांनी प्राप्त केलेले प्रशिक्षण व गुणांकन (क्रेडिट) याबाबतच्या नोंदी शिक्षकांच्या गोपनीय

अहवालामध्ये / सेवापुस्तिकेमध्ये घेण्यात येतील. क्रेडिट व्यवस्था प्रणाली विद्याप्राधिकरणाद्वारे शासनाच्या मान्यतेने विकसित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१७०६०८१६१११७२४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

**(नंदकुमार)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
५. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा. सचिव, सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. सर्व महानगरपालिका आयुक्त
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, मुंबई
१५. अध्यक्ष / सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. शिक्षण संचालक (प्राथमिक/माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७. संचालक, विद्याप्राधिकरण, पुणे.
१८. संचालक, बालभारती, पुणे.
१९. सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२०. सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.
२१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

२२. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था
२३. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
२४. शिक्षण निरिक्षक, मुंबई (पश्चिम, दक्षिण, उत्तर)
२५. सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका
२६. सर्व मुख्य अधिकारी, नगरपालिका
२७. सर्व गटशिक्षणाधिकारी
२८. सर्व मुख्याध्यापक शिक्षणाधिकारी यांच्यामार्फत
२९. निवड नस्ती, प्रशिक्षण

शिक्षण मंत्रालय

# एज्यु-टेक कंपन्यांच्या विरोधात सावधगिरी बाळगण्याबाबत नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना

Posted On: 23 DEC 2021 9:14PM by PIB Mumbai

नवी दिल्ली, 23 डिसेंबर 2021

शिक्षणात तंत्रज्ञानाचा व्यापक प्रभाव लक्षात घेऊन अनेक एज्यु-टेक अर्थात तंत्रस्नेही-शिक्षण संस्थांनी ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम, ट्यूटोरियल्स, स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन इत्यादी सुविधा पुरवण्यास सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर, पालक, विद्यार्थी आणि शालेय शिक्षणातील सर्व हितधारकांनी ऑनलाइन सामग्री आणि एज्यु-टेक संस्थाचालकांकडून दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शन सुविधांची निवड करण्याचा निर्णय घेताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. काय करावे आणि काय करू नये याबाबत सारासार विचार करून निर्णय घ्यायला हवा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, काही कंपन्यांनी दिलेल्या मोफत सेवांचे काळजीपूर्वक मूल्यमापन करावे लागेल. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या निदर्शनास आले आहे की काही एज्यु-टेक कंपन्या विशेषत: असुरक्षित कुटुंबांना लक्ष्य करून पालकांना मोफत सेवा देण्याच्या आणि इलेक्ट्रॉनिक निधी हस्तांतरण (ईएफटी) पावतीवर स्वाक्षरी करून घेण्याचे किंवा ऑटो-डेबिट वैशिष्ट्य कार्यान्वित करण्याचे आमिष दाखवत आहेत.

शिक्षण परिसंस्थेच्या संबंधितांनी काय करावे आणि काय करू नये याबाबत खालील सूचना लक्षात घ्याव्यात :

काय करावे -

1. सदस्यत्वाचे शुल्क भरण्यासाठी ऑटो डेबिट पर्याय टाळा: काही एड-टेक कंपन्या फ्री-प्रीमियम बिझनेस मॉडेल देऊ शकतात ज्यात त्यांच्या बऱ्याच सेवा पहिल्या दृष्टीक्षेपात विनामूल्य असल्यासारखे वाटू शकतात परंतु सातत्याने शिकण्यासाठी प्रवेश मिळविण्याकरिता, विद्यार्थ्यांना सशुल्क सदस्यतेची निवड करावी लागेल. ऑटो-डेबिट सक्रिय केल्यामुळे मुले तो/ती एज्यु-टेक कंपनीद्वारे दिल्या जाणाऱ्या विनामूल्य सेवांमध्ये आपण प्रवेश करत नाही हे लक्षात न घेता सशुल्क वैशिष्ट्यांमध्ये प्रवेश करतात .
2. तुमचा IP पत्ता आणि/किंवा वैयक्तिक डेटा ट्रॅक केला जाऊ शकतो म्हणून सॉफ्टवेअर/डिव्हाइस शिकण्याची स्वीकृती कबूल करण्यापूर्वी अटी व शर्ती वाचा.
3. सामग्री/ॲप खरेदी/पेनड्राईव्ह लर्निंगसह लोड केलेल्या शैक्षणिक उपकरणांच्या खरेदीसाठी टॅक्स इन्व्हॉईस स्टेटमेंट मागून घ्या
4. तुम्हाला ज्या एज्यु-टेक कंपनीचे सदस्यत्व घ्यायचे आहे त्याची तपशीलवार पार्श्वभूमी तपासा.
5. एज्यु-टेककंपन्यांद्वारे प्रदान केलेल्या सामग्रीची गुणवत्ता तपासा आणि ते अभ्यासक्रम आणि आपल्या अभ्यासाच्या व्याप्तीशी सुसंगत आहे आणि आपल्या मुलास सहज समजू शकेल याची खात्री करा.
6. कोणत्याही एज्यु-टेक कंपनीमध्ये तुमच्या मुलाच्या शिक्षणासाठी कोणतीही रक्कम गुंतवण्यापूर्वी पेमेंट आणि सामग्रीबद्दल तुमच्या सर्व शंका/प्रश्न यांचे निरसन करा.
7. डिव्हाइसवर किंवा ॲप किंवा ब्राउझरमध्ये पालक नियंत्रणे आणि सुरक्षा वैशिष्ट्ये सक्रिय करा कारण ते विशिष्ट सामग्रीवर प्रवेश प्रतिबंधित करण्यात आणि ॲप खरेदीवर खर्च मर्यादित करण्यात मदत करते.

8. तुमच्या मुलाला हे समजण्यास मदत करा की शैक्षणिक ॲप्समधील काही वैशिष्ट्ये अधिक खर्च करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी वापरली जातात. एज्यु-टेक कंपन्यांद्वारे वापरल्या जाणाऱ्या संभाव्य विपणन धोरणांबद्दल आणि परिणामांबद्दल त्यांच्याशी बोला.
9. कोणत्याही नोंदणीकृत तक्रारी आणि विपणन युक्तींसाठी एज्यु-टेक कंपनीवर विद्यार्थी/पालकांचे परीक्षण ऑनलाइन पहा. तसेच, आपल्या सूचना आणि परीक्षण प्रदान करा जे इतरांसाठी फायदेशीर असू शकते.
10. तक्रार दाखल करण्यासाठी पूर्ण संमतीशिवाय कोणत्याही शैक्षणिक पॅकेजसाठी स्पॅम कॉल्स/सक्तीने साइनअप केल्याचा पुरावा रेकॉर्ड करा.
11. कोणतेही एज्यु-टेक प्लॅटफॉर्म वापरण्यापूर्वी शिक्षण मंत्रालयाने PRAGYATA मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेली बाल सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे पहा.

(https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/pragyata-guidelines_0.pdf)

हे करू नका

1. एज्यु-टेक म्हणजे शिक्षण-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या जाहिरातींवर अंधविश्वास ठेवू नका.
2. आपल्याला माहिती नसलेल्या कोणत्याही कर्जासाठी स्वाक्षरी करु नका.
3. शिक्षण-तंत्रज्ञान क्षेत्रतील कोणतेही मोबाईल ॲप सत्यता पडताळून घेतल्याशिवाय इन्स्टॉल करु नका.
4. सदस्यत्व घेण्यासाठी आपल्या डेबिट वा क्रेडीट कार्डद्वारे ॲपवर नोंदणी करणे टाळा. कोणत्याही आर्थिक व्यवहारात खर्चाला मर्यादा ठरवून द्या.
5. ई-मेल्स, संपर्क क्रमांक, कार्डची माहिती, पत्ते, इत्यादी बाबी ऑनलाईन शेअर करणे टाळा. ही माहिती विकली जाऊ शकते वा पुढील घोटाळ्यांसाठी तिचा वापर केला जाऊ शकतो.
6. वैयक्तिक व्हिडिओ अथवा फोटो शेअर करु नका. ॲप व्हिडीओ वैशिष्ट्य वापरत असेल किंवा सत्यता पडताळून न पाहिलेल्या प्लॅटफॉर्मवरून व्हिडिओ कॉल येत असेल तर काळजी घ्या.
7. खोट्या भूलथापांना बळी पडून सत्यता न पडताळलेल्या अभ्यासक्रमाचे सदस्यत्व घेऊ नका.
8. शिक्षण-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांकडून प्रसृत झालेल्या यशोगाथांवर कागदोपत्री पडताळणी केल्याशिवाय विश्वास ठेवू नका. अधिक लोकांना जमा करण्यासाठीचा तो सापळा असू शकेल.
9. पालकांच्या परवानगीविना खरेदी करू नका. ऐपमधून परस्पर खरेदी टाळण्यासाठी रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार ओटीपी आधारित पेमेंट करण्याची सवय लावुन घ्या.
10. कोणत्याही विक्रेत्याला आपले बँक खात्याचे तपशील आणि ओटीपी देऊ नका आणि सायबर गुन्ह्यांबाबत सावधगिरी बाळगा.
11. आपणास परिचित नसलेल्या कोणत्याही लिंक वा पॉपअप स्क्रिनवर क्लिक करू नका वा अटॅचमेंट उघडू नका.

शिक्षण-तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांच्या सेवांबाबत त्यांच्या ग्राहकांनी कोणती काळजी घ्यावी याची माहिती ई-कॉमर्स क्षेत्रातील कंपन्यांकडून पुन्हा सादर केली जात आहे.

अधिक माहितीसाठी कृपया या लिंकवर भेट द्या

https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1784582

S.Kane/V.Joshi/V.Sahjrao/P.Malandkar

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा: @PIBMumbai /PIBMumbai /pibmumbai pibmumbai@gmail.com

(Release ID: 1784690) Visitor Counter : 81

Read this release in: English , Urdu , Hindi , Tamil

**राज्यातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी**

**यांचे नवीन प्रशिक्षण धोरण..**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः टिसीएम २०१३/(७१/१३)/प्रशिक्षण

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

तारीख: २९ जानेवारी २०१४

**वाचा —**

**१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९**

**२) राज्य प्रशिक्षण धोरण २०११**

**प्रस्तावना —**

शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या धोरणानुसार राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळांमार्फत सुमारे १.८० कोटी विद्यार्थ्यांना सुमारे ६.७० लाख शिक्षकांकडून शिक्षण देण्यात येत आहे.

२. शिक्षण विभागातंर्गत प्रशिक्षणाशी निगडीत एकूण ७ राज्यस्तरीय संस्था खालीलप्रमाणे कार्यरत आहेत:-

(i) दृक श्रवण शिक्षण संस्था, पुणे (सन १९४८),

(ii) व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई (सन १९५०)

(iii) राज्य शिक्षणशास्त्र संस्था (सन १९६४)

(iv) राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्था, औरंगाबाद (सन १९६५)

(v) राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर (सन १९६८)

(vi) शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई (सन १९७२)

(vii) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था,औरंगाबाद

ह्याशिवाय प्रत्येक जिल्हयामध्ये एक **जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था DIET** (एकूण ३३) कार्यरत आहेत.

३. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार १९८४ साली "राज्य शिक्षण शास्त्र संस्थेची" NCERT च्या धर्तीवर पुर्नरचना करुन **"महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे" (SCERT)** ची स्थापना करण्यात आली.

४. गेल्या काही काळामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे अनेक महत्वाच्या घडामोडी घडल्या आहेत.-

(i) "भारतीय राज्य घटनेमध्ये" दुरुस्ती करुन, ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण ( इ. १ ली ते ८ वी) मिळावे यासाठी **" बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९"** अंमलात आणण्यात आला आहे.

(ii) शिक्षकांचे प्रशिक्षणासाठी जागतिक स्तरावर नवीन तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. (उदा.संगणक, टॅबलेट, व्हीडीओ कॉन्फरन्स इ.)

(iii) मुलांना जागतिक दर्जाचे, समाजपयोगी, रोजगाराभिमूख दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी अभ्यासक्रमामध्येही मोठा बदल करण्यात येत आहे.

(iv) मुलांमध्ये सृजनशीलता, नैतिकता व कल्पकता निर्माण व्हावी यासाठी मोठया प्रमाणावर उपाययोजना करण्यात येत आहेत.

(v) **"राज्य प्रशिक्षण धोरण २०११"** द्वारे प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधिनस्त असलेल्या **सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना पायाभूत प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले असून** प्रत्येक विभागाने त्यांच्या योजनांतर्गत निधीतून १% इतका खर्च हा प्रशिक्षणावर करण्याची मूभा प्रशासकीय विभागांना देण्यात आली आहे.

५. उपरोक्त सर्व संस्थांनी गेल्या २-३ दशकामध्ये अत्यंत उत्कृष्ट काम केलेले असले तरीही वरील घडामोडी पहाता त्यांचे काम व व्यवस्थापनामध्ये कालानुरुप बदल करणे व शिक्षकांना प्रभावी व उपयुक्त प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झालेली आहे. सध्या राज्यस्तरीय संस्थांमध्ये आर्थिक तरतूदी व मनुष्यबळ पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे त्याचा पुरेपुर वापर होत नाही व तसेच त्यांचे प्रयत्नही अपुरे पडत आहेत.

६. शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षणासाठी सध्या प्रामुख्याने खालील योजनांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

(i) सर्व शिक्षा अभियान

(ii) राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

(iii) TEAB (Teacher Education Appraisal Board)

७. निरनिराळया योजनांमधून उपलब्ध होणा-या निधीतून शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना योग्य काळानुरुप व सक्षम करणारे प्रशिक्षण कसे देता येईल हा प्रश्न अनेक दिवसांपासून शासनाच्या विचाराधीन होता. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने विभागाचे "**नवीन प्रशिक्षण धोरण**" स्वीकारण्याचा पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय—

येथून पुढे सर्व प्रकारच्या प्रशिक्षणासाठी राज्य स्तरावर **"महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे"** (Maharashtra State Council of Education, Research and Training (SCERT) येथून पूढे **"विद्या परिषद"** ही राज्यातील प्रशिक्षणाची शिखर संस्था म्हणून कार्यरत राहील व **जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था** (District Institute of Education and Training) DIET-डायट जिल्ह्याची शिखर संस्था म्हणून काम करतील.

२. **"विद्या परिषद SCERT"** व **"जिल्हा संस्था DIETS"** यांची कामे, कर्तव्ये व जबाबदाऱ्या प्रामुख्याने खालीलप्रमाणे राहतील.

(i) शिक्षक, अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा (Traning Need) निश्चित करणे.

(ii) शिक्षणाच्या गरजा लक्षात घेता प्रशिक्षणाच्या पध्दती (Traning Methodology) कालावधी (Duration) निवासी/अनिवासी इ. निश्चित करणे.

(iii) प्रत्येक कार्यक्रमासाठी आवश्यक तो उत्कृष्ट दर्जाचा अद्ययावत साधनसामुग्री (Course Meterial) तयार करुन घेणे.

(iv) उत्कृष्ट व दर्जेदार प्रशिक्षक (Master Trainers) शोधणे व तयार करणे इ. त्यांचे गुणवत्ता व योग्यतेनुसार वर्गीकरणे करणे इ.

(v) प्रशिक्षणाचे वार्षिक वेळापत्रक (Annual Calender) तयार करुन दर्जेदार व प्रभावी प्रशिक्षण उपलब्ध करुन घेणे.

३. शिक्षक, अधिकारी/कर्मचारी यांना दर्जेदार व प्रभावी प्रशिक्षण उपलब्ध होण्यासाठी "विद्या परिषद-SCERT" व "जिल्हा संस्था DIETS" यांनी योग्य ती सर्व उपाययोजना करावी. उदा :- वार्षिक आराखडा तयार करणे, चांगले प्रशिक्षक तयार करणे, चांगले स्थळ शोधणे, उपलब्ध होणा-या

आर्थिक तरतूदीप्रमाणे वार्षिक नियोजनामधून अग्रक्रमाने प्रशिक्षण हाती घेणे, झालेल्या प्रशिक्षणाचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन करणे इ.

४. प्रशिक्षण देतांना "विद्या परिषद- SCERT" व "जिल्हा संस्था DIETS" यांनी खालील मुद्यांचा प्रामुख्याने विचार करावा.

i) उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षक (मास्टर ट्रेनर्स) हे २ ते ३ वर्षासाठी निश्चित करण्यात यावेत. त्यात वारंवार बदल करु नये. मास्टर ट्रेनर्स निवडताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रशिक्षकाचा विचार व्हावा. (याबाबत स्वतंत्र शासन निर्णय काढण्यात येईल

ii) प्रशिक्षणाचे स्थळ चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे यासाठी "विद्या परिषद- SCERT" व "जिल्हा संस्था DIETS" स्वतःच्या इमारतीचा प्रामुख्याने विचार व्हावा.

iii) निवासी प्रशिक्षकासाठी राहणे व जेवणाची उत्तम सोय असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यकते प्रमाणे CSR अंतर्गत खाजगी उद्योजकांची मदत घ्यावी किंवा खाजगी इंजिनिअरींग कॉलेज इ. यांच्या हॉस्टेलची मदत घ्यावी.

५. राज्यामध्ये शिक्षक, अधिकारी/कर्मचारी यांना प्रभावी व दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे **"उच्चस्तरीय सुकाणू समिती"** स्थापित करण्यात येत आहे.

**(अ) संरचना:-**

| | | |
|---|---|---|
| i) | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | अध्यक्ष |
| ii) | संचालक, यशदा, पुणे | सदस्य |
| Iii) | आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| iv) | संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद | सदस्य |
| v) | सचिव, माहिती व तंत्रज्ञान | सदस्य |
| vi) | आयुक्त, क्रीडा महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| vii) | नामांकीत प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी (२) | सदस्य |
| viii) | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सदस्य-सचिव |

**(ब) कार्यकक्षा** :-

(i) "विद्या परिषद- SCERT" व "जिल्हा संस्था DIETS" कडून विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असे प्रशिक्षणाचे विषय व क्षेत्र निवडणे.

(ii) प्रशिक्षणाचा वार्षिक आराखडा अंतिमरीत्या तयार करुन त्यास मान्यता देणे.

(iii) सर्व प्रशिक्षण दर्जेदार व प्रभावी राहील यासाठी सर्व उपाययोजना करणे.

(iv) उत्कृष्ट व दर्जेदार प्रशिक्षिक (मास्टर ट्रेनर्स) तयार करणेसाठी आवश्यक ते धोरण तयार करणे.

(v) "विद्या परिषद- SCERT" व "जिल्हा संस्था DIETS" संस्थेवर योग्य ते नियंत्रण ठवणे, त्यांना मार्गदर्शन देणे इ.

(vi) उपलब्ध निधीचा योग्य, पुरेपुर व गुणात्मक वापर व्हावा हयासाठी सर्व उपाययोजना करणे.

६. **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** अंतिम केलेल्या वार्षिक आराखडयाप्रमाणे प्रभावी व दर्जेदार प्रशिक्षण देण्यासाठी राज्य व जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे **"कार्यकारी अंमलबजावणी समिती"** स्थापन करण्यात येत आहे

**(अ) राज्यस्तरीय कार्यकारी/अंमलबजावणी समिती:-**

| | | |
|---|---|---|
| i) | आयुक्त, शिक्षण | अध्यक्ष |
| ii) | संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सह अध्यक्ष |
| iii) | राज्य प्रकल्प संचालक, | सह अध्यक्ष |
| iv) | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) | सदस्य |
| v) | शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| vi) | अध्यक्ष, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ | सदस्य |
| vii) | यशदा YASHADA प्रतिनिधी | सदस्य |
| viii) | सहसंचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद | सदस्य |
| ix) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (२) (प्रत्येक २ वर्षांनी नवीन प्रतिनिधी निवडला जाईल.) | सदस्य |
| x) | सहसंचालक (शिक्षक शिक्षण), महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद | सदस्य सचिव |

**(ब) जिल्हास्तरीय कार्यकारी अंमलबजावणी समिती**

| | | |
|---|---|---|
| i) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| ii) | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | उपाध्यक्ष |
| iii) | जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| iv) | जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य |
| v) | विद्या परिषद, पुणे प्रतिनिधी | सदस्य |
| vi) | शाळा मुख्याध्यापक प्रतिनिधी (२) (प्रत्येक २ वर्षांनी नवीन प्रतिनिधी घेणे आवश्यक.) | सदस्य |
| vii) | ज्येष्ठ अधिव्याख्याता (उपप्राचार्य),जि.शि.व प्र.सं. | सदस्य सचिव |

**(क) वरील दोन्ही समित्यांची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील**.

I. **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** अंतिम केलेल्या आराखडयाप्रमाणे सर्व प्रशिक्षण दर्जेदार व प्रभावी राहतील यासाठी सर्व उपाययोजना करणे व दक्षता घेणे.

II. प्रत्येक प्रशिक्षणामध्ये निवडलेल्या सर्व प्रशिक्षणार्थी हजर राहतील यासाठी करावयाची उपायोजना. सर्व प्रशिक्षणार्थी यांना उत्कृष्ट दर्जाचे आवश्यक ती साधनसामुग्री (कोर्स मटेरियल) उपलब्ध करुन देणे.

III. **उच्चस्तरीय सुकाणू समितीने** निवडलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत सर्व प्रशिक्षणाचे मुल्यमापन करुन घेणे इ.

७. राज्यातील इतर संस्थांनी [उदा: (i) (दृक श्रवण शिक्षण संस्था, पुणे, (ii) व्यवसाय मार्गदर्शन संस्था, मुंबई, (iii) राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्था, औरंगाबाद, (iv ) राज्य विज्ञान संस्था, नागपूर, (v) शैक्षणिक तंत्रज्ञान कक्ष, वरळी, मुंबई, (vi) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशिक्षण संस्था,औरंगाबाद] यांनीसुध्दा "विद्या परिषद (SCERT)" शी सल्लामसलत करुन त्यांच्या मार्गदर्शनाखाली वरीलप्रमाणे "वार्षिक वेळापत्रक (Annual Calender)" तयार करावे व त्यास **राज्यस्तरीय कार्यकारी / अंमलबजावणी समिती** व **सुकाणू समितीची** मान्यता मिळवावी.

८. प्रशिक्षणासाठी एकूण उपलब्ध निधीपैकी २० टक्के निधी "विद्या परिषद (SCERT)", "जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DITES)" व इतर प्रशिक्षण संस्थांना नाविन्यपूर्ण प्रशिक्षणासाठी मागणीप्रमाणे **सुकाणू समितीच्या** मान्यतेने उपलब्ध करुन देण्यात येईल. उर्वरित ८० टक्के निधी राज्य शासनाने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे निश्चित प्रशिक्षण कार्यक्रमावर खर्च करण्यात येईल.

९. "विद्या परिषद (SCERT)", "जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DITES)" व इतर संस्थांनी वार्षिक आराखडयाप्रमाणे दर ३ महिन्याकरिता आवश्यक निधीची मागणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (MPSP) / शासनाकडे करावी. दोन महिन्याचे प्रशिक्षण संपल्यावर संबंधित संस्थांनी प्रशिक्षणाचे मुल्यांकनाचा (संख्यात्मक व गुणात्मक) अहवाल खर्चाच्या तपशिलासह MPSP व राज्य शासनाला सादर करावा. झालेल्या प्रशिक्षणाची गुणवत्ता व खर्चाचे प्रमाण पाहून MPSP /शासन पुढील ३ महिन्यासाठी निधी उपलब्ध करुन देईल.

१०. इथूनपुढे उपरोक्त प्रमाणे सर्व निधी "विद्या परिषद SCERT" यांना वितरीत करण्यात येईल. "विद्या परिषद (SCERT)" यांना निधीचा योग्य तो विनियोग करुन त्याचा हिशोब ठेवणे आवश्यक राहील.

११. राज्यामध्ये प्रशिक्षणाची गुणवत्ता दिवसेंदिवस वाढेल यासाठी "विद्या परिषद (SCERT)", "जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DITES)" मध्ये काम करणारे सर्व अधिव्याख्याता, वरिष्ठ अधिव्याख्याता, प्राचार्य यांनी दरवर्षी कमीतकमी दोन राज्योपयोगी/ विद्यार्थ्यांना सहाय्यभुत ठरणारे संशोधन प्रकल्प सादर करणे अनिवार्य राहील. याविषयी स्वतंत्रपणे विस्तृत आदेश निर्गमित करण्यात येतील.

१२. सर्व प्रशिक्षण संस्थांनी तयार केलेल्या व राज्यस्तरीय सुकाणू समितीने मान्य केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम विभागाच्या व इतर सर्व शासनाच्या अधिकृत वेबसाईटवर टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१२९१६००१६८०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(री.वि.फणसेकर)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
५. सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. आयुक्त, शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे
९. आयुक्त, क्रीडा महाराष्ट्र राज्य, पुणे
१०.आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे
११.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१२.संचालक, यशदा, पुणे
१३.संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नी रोड, मुंबई
१४.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
१५.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
१६.अध्यक्ष, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
१७.सर्व सहसचिव/ उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१९.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
२०.सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र
२१.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),महाराष्ट्र राज्य,पुणे
२२.निवड नस्ती (माशि-४)

**प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र**
**विद्या प्राधिकरणाची पुनर्रचना-**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्र. डायट ४५१६/(४०/१६) /प्रशिक्षण,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक : १७ ऑक्टोंबर, २०१६

पहा :- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आरटीई-२०१३/प्र.क्र.२५/प्राशि-१, दिनांक १९ मार्च, २०१३
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शैगुवि-२०१५/ (८०/१५)/ एसडी-६, दिनांक २२ जून, २०१५.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.याचिका-६२१४/प्र.क्र.१६/ एसडी-१, दिनांक २९ फेब्रुवारी २०१६

## प्रस्तावना -

१. **पार्श्वभूमी :-**

(१) मा. मुख्यमंत्री यांनी राज्यास गुणवत्तेच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर प्रथम तीन क्रमांकामध्ये आणण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यास अनुसरुन दिनांक २२ जून, २०१५ रोजी "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(२) सदर शासन निर्णयानुसार आजमितीस राज्यातील सुमारे ६०,५८१ शाळांमध्ये स्वयंस्फूर्तीने ज्ञानरचनावादी पध्दत कार्यान्वित करण्यात आली आहे व राज्यातील सुमारे २८,७९१ शाळा डिजीटल आणि १३,९२३ शाळांमध्ये Activity Based Learning सुरू करण्यात आले आहे. २,२७९ शाळा ISO मानांकित झाल्या असून राज्यातील ४४,४१६ शिक्षकांनी तंत्रस्नेही शिक्षक म्हणून स्वत:ची नोंद केली आहे. राज्यातील शिक्षण प्रशासनातील अधिकारी आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील (डायट) मधील अधिकारी यांनी २२,७९३ शाळा दत्तक घेतल्या आहेत. समाज सहभागातून आजमितीस सुमारे १७३ कोटी रू. लोकनिधी शाळांनी प्राप्त केला आहे.

अशा विविध प्रयत्नांतून राज्यातील १९,७९४ शाळा प्रगत झाल्याचे घोषित करण्यात आले आहे.

(३) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमात डिसेंबर, २०१७ पर्यंत १००% शाळा प्रगत करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले असून शैक्षणिक सत्र २०१६-१७ पर्यंत ५०% प्राथमिक, २५% उच्च प्राथमिक व २०% माध्यमिक शाळा प्रगत करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. एवढा मोठा उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी राज्य, जिल्हा, तालुका व केंद्र पातळीपर्यंत सशक्त शैक्षणिक सक्षमीकरण व्यवस्था तयार करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुनर्रचित करणे तसेच तालुका व केंद्र स्तरीय व्यवस्था पुनर्परिभाषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय** :

**१. विद्या प्राधिकरण** : यापुढे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेस विद्या प्राधिकरण असे संबोधण्यात येईल. त्याची रचना खालील प्रमाणे राहील. विद्या प्राधिकरणात गाभा समिती स्थापित करण्यात येईल.

**१-अ) गाभा समितीची रचना** -

विद्या प्राधिकरणाने कार्यवाहक म्हणून तर गाभा समितीने दिशादर्शक म्हणून कार्य करावयाचे आहे. त्यामध्ये प्रशासकीय व शिक्षण क्षेत्रातील अशासकीय व्यक्तींचा समावेश राहील. सदर समितीची सदस्य संख्या २० इतक्या मर्यादेपर्यंत राहील. तथापि, बैठकीस सदर क्षेत्रात कार्य करणा-या व तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करता येईल.

**गाभा समितीची रचना खालीलप्रमाणे असेल** -

शासकीय सदस्य - विद्या प्राधिकरणा मधील सदस्य, शिक्षण विभागातील क्षेत्रिय स्तरावरील गुणवत्तावाढीस यशस्वी झालेल्या प्रत्येक स्तर म्हणजे जिल्हा शिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे प्रतिनिधी, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख व शिक्षकांचे प्रतिनिधी

अशासकीय सदस्य - चांगल्या पध्दती व संशोधन यासंदर्भात राष्ट्रीय स्तरावर कार्य करत असलेले राज्याबाहेरील शिक्षण तज्ञ, राज्यातील विद्यापीठांचे प्रतिनिधी, काही आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक असलेले अशासकीय सदस्यांचा समावेश राहील.

**१- ब) गाभा समितीची कार्ये** -

१ तीन महिन्यातून एकदा बैठक घेण्यात येईल आणि त्यावेळी प्रगतीचा आढावा तसेच आवश्यक असणारे सहाय्य/सुधारणा याबाबतची कार्यवाही करेल.

२ शैक्षणिक गुणवत्ता सुधारणे व ती वरच्या पातळीवर टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक कार्यक्रमांची सुयोग्य आणि स्पष्ट आखणी करेल आणि दिशा देईल.

३ विविध कार्यक्रमांची उद्दिष्टये साध्य करण्यासाठी विविध भूमिका, आंतरक्रिया आणि पध्दती स्पष्ट करेल.

४ प्रत्येक प्रक्रियेचे निष्पती दर्शके तयार करेल.

५ वर आखलेल्या विविध कार्यक्रमांना विषयाचा आशय, अध्यापन शास्त्र इत्यादीबाबत नैपुण्य असलेल्या संस्थांकडून शैक्षणिक सहाय्य आवश्यक असू शकतील. गाभा समिती अशा संस्थांचा शोध घेऊन त्यांची सहायता घेण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करेल.

६ वैयक्तिक तसेच संस्थात्मक स्तरावर क्षमता विकसित करणे सर्वाधिक महत्वाचे असल्याने गाभा समिती यासाठी आराखडा, नियोजन आणि कृती कार्यक्रम तयार करेल.

## २. विभागस्तरावर प्रादेशिक विद्या प्राधिकरणे :-

प्रत्येक महसूली विभागामध्ये एक प्रादेशिक विद्या प्राधिकरणाची स्थापना करण्यात येईल. मुख्य विद्या प्राधिकरण व विभागीय विद्या प्राधिकरणासाठी पुनर्रचनेनंतर सध्याच्या संस्थांचे बदललेले स्वरुप खालील तक्याप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | विभागीय कार्यालय | वर्तमान संस्था | पुनर्रचनेनंतरची संस्था |
|---|---|---|---|
| १ | पुणे | विद्या प्राधिकरण | विद्या प्राधिकरण मुख्यालय ( विज्ञान, गणित व इंग्रजी विषय वगळून इतर सर्व विषय तज्ञत्व) |
| २ | नागपूर | SISE | प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर (विज्ञान व गणित तज्ञत्व) |
| ३ | अमरावती | DIET | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, अमरावती |
| ४ | औरंगाबाद | SIEM | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद (आंग्लभाषा तज्ञत्व) |
| ५ | नाशिक | DIET | प्रादेशिक विद्या प्राधिकरण, नाशिक |
| ६ | मुंबई | IVGS | प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई (व्यवसाय मागदर्शन तज्ञत्व) |

येथे असेही स्पष्ट करण्यात येत आहे की, पुणे येथे विद्या प्राधिकरण मुख्यालय असल्याकारणाने तेथे प्रादेशिक विद्या प्राधिकरणाची आवश्यकता नाही. तथापि पुणे जिल्हयासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) वेगळयाने राहील. तसेच अमरावती व नाशिक येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET) मध्ये प्रादेशिक विद्या प्राधिकरणासाठी तयार करण्यात आलेली ६ विषयांची १२ पदे पदस्थापित करण्यात येतील. प्रत्येक प्रादेशिक प्राधिकरणामध्ये शैक्षणिक सक्षमीकरणाचे वातावरण निर्माण होण्यासाठी किमान ३० शैक्षणिक पदे असावी, असा विचार केला गेला. म्हणून प्रत्येक प्रादेशिक प्राधिकरणाला आधीच उपलब्ध संस्थांशी जोडले गेल्याने या संस्थांमध्ये नव्याने सहचर्य (synergy) निर्माण करावे लागणार नाही. अधिक अंतरावर असलेल्या जिल्हयांतील त्यांच्या विभागामध्येच प्रादेशिक प्राधिकरणाची सोय करण्यात येणार असल्यामुळे यापूर्वी शिक्षक किंवा अधिकारी हे पुण्याला यायचे, त्या सर्वांचा येण्या-जाण्याचा खर्च व वेळ वाचणार आहे. अंत: अशा प्रकारच्या प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या संकल्पनेने कमीतकमी मनुष्यबळ वापरुन व कमीतकमी आर्थिक व्यय करुन अधिकाअधिक शैक्षणिक लाभ घेता येईल.

सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरणांमध्ये प्रमुखांची पदस्थापना विभागातंर्गत अधिकाऱ्यांकडून अर्ज मागवून निवड पद्धतीने करण्यात येतील. त्याच संवर्गातील उमेदवारांचे अर्ज न आल्यास किंवा निवडीमध्ये योग्य उमेदवार न मिळाल्यास एक स्तर कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने हे पद भरण्यात येईल.

## ३. पुनर्रचित प्राधिकरणाच्या पदांची संरचना -

विद्या प्राधिकरण, पुणे मुख्यालय येथे संचालकांचे १ पद राहील व २ सहसंचालकांची पदे राहतील. सदर पदांशिवाय पुणे येथील मुख्यालय ठिकाणी तसेच नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक व मुंबई येथील प्रादेशिक प्राधिकरणाची संरचना खालील तक्त्यात स्पष्ट केल्याप्रमाणे राहील.

## भाग-१ विद्या प्राधिकरण,पुणे मुख्यालय पदांची संरचना

| अ.क्र. | मुख्य विभाग व उपविभाग | उपसंचालक | वर्ग-अ | वर्ग-ब | अधिक्षक (वर्ग-ब) | लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग-क- विषय सहायक/ प्रतिनियुक्तीव्दारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | **मानव संसाधन (HRD)** | | | | | | | | |
| १.१ | आस्थापना | | १ | १ | २ | ६ | ० | ० | ५ |
| १.२ | लेखा | | १ (लेखा) | १ (लेखा) | ० | ८ | ० | ० | १ |
| १.३ | वसतीगृह | १ | ० | ० | १ | २ | ० | ० | १ |
| १.४ | CPD (शिक्षक/ अधिकारी) | | १ | १ | ० | २ | २ | १ | |
| १.५ | ग्रंथालय | | ० | ० | ० | ३ | ० | ० | १ |
| १.६ | SSA, RMSA | | १ | २ | ० | ३ | २ | ० | १ |
| २ | **समन्वय** | | | | | | | | |
| २.१ | अभ्यासक्रम विकसन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.२ | मूल्यमापन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.३ | संशोधन | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.४ | संकीर्ण | १ | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.५ | विज्ञान | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.६ | इंग्रजी | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.७ | गणित | | १ | १ | ० | १ | १ | ० | १ |
| २.८ | व्यवसाय मार्गदर्शन व प्रशिक्षण | | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | **आय.टी. व प्रसार माध्यम** | १ | २ | २ | १ | ५ | ३ | २ | ३ |
| ४ | **भाषा** | | | | | | | | |
| ४.१ | मराठी | | १ | २ | ० | १ | ३ | १ | |
| ४.२ | ऊर्दू | | १ | २ | ० | १ | ३ | १ | |
| ४.३ | इतर भाषा | | ० | ० | ० | ० | १० | ० | |

| अ.क्र | मुख्य विभाग/ उपविभाग | उपसंचालक | वर्ग-अ | वर्ग-ब | अधिक्षक (वर्ग-ब) | लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग-क- विषय सहायक/ प्रतिनियुक्तीव्दारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ५ | **सामाजिक शास्त्र कला व क्रीडा** | | | | | | | | |
| ५.१ | कला विभाग व क्रीडा समन्वय | १ | १ | २ | ० | २ | २ | १ | |
| ५.२ | सामा.शास्त्र (इतिहास,भूगोल, ना.शास्त्र) | | १ | २ | ० | २ | २ | १ | |
| ६ | **सेवापूर्वशिक्षण, बालशिक्षण, मानस शास्त्र** | | | | | | | | |
| ६.१ | सेवापूर्व शिक्षण | १ | १ | १ | १ | २ | ० | १ | १ |
| ६.२ | बालशिक्षण, मानस शास्त्र | | १ | २ | | | | | |
| ७ | **समता** | | | | | | | | |
| | लैगिंक परस्परावलंबन, धार्मिक परस्परावलंबन, जातीय परस्परावलंबन, CWSN, शाळाबाह्य मुले, शालेय व्यवस्थापन समिती | १ | २ | ५ | ० | २ | ५ | २ | २ |
| ८. | आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष | ० | २ | ४ | ० | २ | ४ | २ | १ |
| | **एकूण-** | ७ | २४ (१ पद लेखा) | ३६ (१ पद लेखा) | ५ | ४८ | ४३ | १५ | ३२ |

## भाग-२ विभागीय विद्या प्राधिकरणे

| अ.क्र | विभागीय विद्या प्राधिकरण | समाविष्ठ विभाग | उपसंचालक | वर्ग-अ | वर्ग-ब | लेखाधिकारी/ अधिक्षक (वर्ग-ब) | लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर | प्रतिनियुक्तीव्दारा शाळा/ क्षेत्रीय | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | विभागीय विद्या प्राधिकरण,नागपूर (राज्य गणित व विज्ञान संस्था) | विज्ञान | १ | २ | ३ | ० | २ | ३ | २ | ६ |
| | | गणित | | २ | ३ | १ | २ | ३ | २ | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | इंग्रजी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामा. शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दु | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय.टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण -** | | **१** | **४** | **११** | **१** | **४** | **११** | **४** | **६** |
| २ | विभागीय विद्या प्राधिकरण (DIET, अमरावती) | इंग्रजी | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामा. शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दु | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय.टी. | | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | **एकूण -** | | **०** | **०** | **६** | **०** | **०** | **६** | **०** | **०** |

| अ. क्र. | विभागीय विद्या प्राधिकरण | समाविष्ठ विभाग | उपसंचालक | वर्ग-अ | वर्ग-ब | लेखाधिकारी/ अधिक्षक (वर्ग-ब) | लिपिक/ डाटा एंट्री ऑपरेटर | वर्ग-क- विषय सहायक/ प्रतिनियुक्तीव्दारा शाळा/ क्षेत्रीय कार्यालयाकडून | कंत्राटी नियुक्तीने शासनाबाहेरील लोकांना CSR च्या मदतीने | वर्ग-४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| ३ | विभागीय विद्या प्राधिकरण, औरंगाबाद (राज्य आंग्लभाषा संस्था) | इंग्रजी | १ | २ | ३ | १ | ३ | ३ | २ | ६ |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामा.शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दु | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय.टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण -** | | **१** | **२** | **९** | **१** | **३** | **९** | **२** | **६** |
| ४ | विभागीय विद्या प्राधिकरण, नाशिक (DIET, नाशिक) | इंग्रजी | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामा.शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दु | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय.टी. | | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| | एकूण - | | **०** | **०** | **६** | **०** | **०** | **६** | **०** | **०** |
| ५ | विभागीय विद्या प्राधिकरण, मुंबई (व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था) | मार्गदर्शन | १ | २ | २ | १ | ३ | ५ | २ | ६ |
| | | कार्यानुभव | | ० | १ | ० | ० | २ | १ | |
| | | इंग्रजी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | मराठी | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | गणित | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | विज्ञान | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | सामा.शास्त्र | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | उर्दु | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | | आय.टी. | | ० | १ | ० | ० | १ | ० | |
| | **एकूण -** | | **१** | **२** | **१०** | **१** | **३** | **१४** | **३** | **६** |

टिप :-

१. प्रत्येक विषयाची संबंधित पदे संबंधित विषयामध्ये तज्ञ असलेल्या व्यक्तींमधूनच भरण्यात येतील. काही लोक संबंधित विषयाची पदव्युत्तर पदवी नसताना सुध्दा अनुभवाने पारंगतता आत्मसात केलेले असतात. प्रतिनियुक्ती किंवा कंत्राटी पध्दतीने अशा व्यक्तींची निवड केली जाईल.

२. बालभारतीच्या विद्याशाखेतील सर्व लोक विद्या प्राधिकरणामध्ये योग्य पदांवर पदस्थापित केले जातील. हे लोक सेवानिवृत्त होईपर्यंत विद्या प्राधिकरणामध्ये कार्य करतील. त्यांचे वेतन व भत्ते बालभारती कडूनच अदा केले जातील. हे लोक सेवानिवृत्त होईपर्यंत ज्या पदांवर कार्य करतील ती पदे विद्या प्राधिकरणामार्फत इतर मार्गानी भरली जाणार नाहीत.

३. वर्ग "अ" व वर्ग "ब" मधील क्रीडाची पदे क्रीडा विभागातील अधिकारी, बालशिक्षणाची पदे महिला व बालविकास विभागाचे अधिकारी (तसेच काही उत्सुक व होतकरु उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार, ग.वि.अ.) यांमधून संबंधित विषयांची आवड असणाऱ्या व्यक्तींमधून निवड प्रक्रिया अवलंबून भरण्यात येतील.

४. समता विभागातील उपसंचालक व वर्ग "अ" ची पदे व स्वयंसेवी संस्था सदस्य सोडून बाकीची सर्व पदे सर्व शिक्षा अभियानाचे राज्य, जिल्हा व तालुकास्तरीय लोकांमधून निवड प्रक्रिया अवलंबून भरण्यात येतील.

५. विद्या परिषद व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेमध्ये सध्या मंजूर असलेल्या पदांमधून काम सुरु करण्यात येईल. अधिकच्या पदांच्या आवश्यकतेबाबत संबंधित विभागाकडे नवीन पदनिर्मितीचा प्रस्ताव अथवा अनावश्यक पदे रद्द करुन अत्यावश्यक पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

६. विद्या प्राधिकरण तसेच प्रादेशिक विद्या प्राधिकरणांच्या सर्व पदे निवड पद्धतीने एका वेळी ५ वर्षाकरीता विभागीय अधिकारी व शिक्षकांमधून भरण्यात येतील. पाच वर्ष संपल्यावर सर्व पदांकरीता फेर निवड करण्यात येईल. आधीचे अधिकारी / शिक्षक पुन्हा अर्ज करू शकतात. निवड झाल्यावर त्यांची पदस्थापना पुन्हा ५ वर्षाकरीता करण्यात येईल. त्यासाठी आवश्यकतेनुसार वेगळयाने नियमावली करण्यात येईल.

४. **<u>विद्या प्राधिकरणाची कार्ये</u> :-**

i. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुणवत्तेच्या परिभाषेचा अभ्यास करून राज्यातील शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी Benchmark निश्चित करणे. या बेंचमार्क मध्ये कालपरत्वे वेळोवळी आवश्यकतेनुसार बदल करणे.

ii. निश्चित केलेल्या बेंचमार्कच्या प्राप्तीसाठी.

- अभ्यासक्रम विकसन
- पाठयक्रम विकसन
- पाठय व इतर साहित्य विकसन
- शिक्षक व अधिकारी यांचे सातत्यपूर्ण व्यवसायिक विकसन.

- मूल्यमापन प्रक्रिया विकसन
- अडचणींवर मात करण्यासाठी संशोधन करणे.

वरील सर्व बाबींसाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञान / संगणक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

iii. बेंचमार्क प्राप्तीसाठी सर्व स्तरावर स्पष्टता यावी यासाठी स्पष्ट क्षमता संपादणूक पातळी (Learning Indicators) परिभाषित करून त्यांचे Continuous and Comprehensive Education (CCE) किंवा अन्य मूल्यमापन प्रक्रियेशी सहसंबंध स्पष्ट करणे.

iv. अभ्यासक्रम, पाठयक्रम, पाठय व इतर साहित्य विकसित करत असताना तसेच शिक्षक व अधिकारी व्यवसायिक विकसन कार्यक्रम आखत असताना क्षमता मूलक विचारांकडे लक्ष देणे. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत १००% मुलांना शिक्षण द्यावयाचे आहे. परंतु ते राबवत असताना बरेचशे शिक्षक व अधिका-यांना १००% मुले शिकू शकतात यात विश्वास नसल्याचे जाणवले. त्याच्या मुळाशी क्षमता बद्दलचे समज अपुरे असणे असे ही जाणवले. त्यामुळे माणसाचे चार शरीर प्रकार, विविध धर्म प्रकार, विविध जाती प्रकार, विविध आर्थिक वर्ग, विविध भौगालिक जन्म स्थान व रहाण्याचे ठिकाण तसेच शहरी व ग्रामीण रहिवास इत्यादी असल्यावर ही माणसे समान असतात हे पटणे सक्षमीकरणाचा सर्वात महत्वाचा घटक आहे. यासाठी विद्या प्राधिकरणाने निरंतर कार्य करणे. या सर्व प्रकारच्या माणसांचे परस्परावलंबनाची संकल्पना समजल्याने क्षमतेची संकल्पना अधिक स्पष्ट होईल हे ध्यानात ठेवणे. क्षमता विभागाच्या कार्याचा अल्लेख करताना यावर विस्तृत चर्चा केली जाईल.

v. अध्ययन व विकासाच्या विविध संधीसाठी साहित्य तयार करणे. उदा. मुक्त दूरस्थ अध्ययन, स्वयं-अध्ययन, गट आणि केंद्रस्तरावर चर्चा, on line स्वयं-अध्ययन एंव चर्चा प्रमाण पत्र प्रदान किंवा या सर्वचे विविध combination.

vi. वरील सर्व तसेच जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था **(District Institute of Educational Continuous Professional Development - DIECPD) डायटचे नवीन नाव**) व तालुका आणि केंद्र स्तरावरील साधन व्यक्ती तसेच शिक्षक सक्षमीकरणाच्या सर्व घटकांची क्षमता समृध्दी करणे.

vii. हे सर्व प्रभावीपणे आणि निरंतर करता यावा यासाठी विद्या प्राधिकरण स्वता:च्या सदस्यांची निवड व त्यांचे सातत्यपूर्ण व्यवसायिक विकासाची योजना आखेल जेणेकरून प्राधिकरण स्तरावर भविष्यात केव्हाही मरगळ तयार होणार नाही. याप्रकारचे नित्य नवीन शिकण्याची परंपरा आर्थिक लाभाला न जोडता ज्ञान प्राप्तीचा लाभाला जोडला जाईल.

viii. यात विद्या प्राधिकरण यशस्वी होत आहे किंवा नाही याचा मोजमाप बेंचमार्कच्या हिशोबाने मुले प्रगत होत आहेत की नाही हाच राहील. अत: मुलांच्या प्रगतीच्या मुल्यमापनातून प्राधिकरण स्वत:चे यश किंवा अपयश ठरवेल

ix. पुनर्रचित विद्या प्राधिकरणाची विविध विभागांच्या कार्याचा विस्तृत विवरण तयार

करण्यात येईल हे विवरण भविष्याचे प्राधिकरण तथा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बेंचमार्कच्या आधारावर प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र तयार करण्याच्या हेतूने तयार करण्यात येईल. त्यासाठी पुनर्रचित प्राधिकारणामध्ये निवड प्रक्रिया अवलंबून रूजू झालेल्या सदस्यांचे सक्षमीकरण अगत्याचे असणार आहे. या सक्षमीकरण प्रक्रियेच्या दरम्यान साधारण सहा महिन्यांनी विभागवार विस्तृत कार्यविवरण तयार होईल. त्यावेळी शासन मान्यतेने हे विवरण प्रसिध्द केले जाईल.

## ५. निवड समित्यांची स्थापना :-

विद्या प्राधिकरणाचे मुख्यालयाच्या ठिकाणी व प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या ठिकाणी विषयनिहाय सक्षमीकरणासाठी योग्य व्यक्तींची निवड होणे आवश्यक आहे, जेणे करुन सदर प्राधिकरणांना त्यांच्या कामांचे उद्दिष्ट गाठता येऊ शकेल. सदर प्राधिकरणांवर तसेच संसाधन समूहांमध्ये योग्य व्यक्तींची निवड करण्यासाठी निवड समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे निवड समित्यांची स्थापना करण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे -

### ५.१ राज्यस्तरीय निवड समिती :

#### ५.१.१ राज्यस्तरीय निवड समितीची रचना -

प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समितीची स्थापना करण्यात येत आहे. त्याची संरचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| अध्यक्ष | - प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, |
| सहअध्यक्ष | - आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| सदस्य सचिव | - संचालक, विद्या प्राधिकरण |
| सदस्य | - विद्या प्राधिकरणातील अधिकारी |
| सदस्य | - DIET मधील अधिकारी |
| सदस्य | - जिल्हा प्रशासनाचे अधिकारी |

सदर समितीमधील सदस्यांची निवड अध्यक्ष व सहअध्यक्ष करतील.

#### ५.१.२ समितीची कार्ये :-

राज्यस्तरीय निवड समितीचे कार्यक्षेत्र व कार्यप्रक्रिया खालीलप्रमाणे राहील :-

(a) विद्या परिषदेतील नियमित सेवेतून नियुक्ती, प्रतिनियुक्ती, CSR च्या मदतीने कंत्राटी पध्दतीने नियुक्ती व राज्य संसाधन समुहातील सदस्यांची नियुक्तीसाठी निवड या समितीचे कार्यक्षेत्र राहील.

(b) वर्षातून किमान एकदा निवड प्रक्रिया राबविणे. परंतु आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक वेळा ही प्रक्रिया राबविता येईल.

(c) तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे विविध संवर्ग व विषयातील लोकांकडून जाहिरात देऊन Online पध्दतीने अर्ज मागविणे.

(d) आलेल्या अर्जाची छाननी करुन आणि आवश्यकता भासल्यास मुलाखत किंवा अन्य प्रक्रिया जसे सादरीकरण, प्रत्यक्ष प्रशिक्षण देणे इ. अवलंबून उमेदवारांची निवड करणे.

(e) निवड करताना एकमेव निकष “सर्वाधिक शाळांमध्ये बदल घडविण्यात आलेले यश” राहिल. या निकषामध्ये पात्र असलेल्या व्यक्तींचा प्राधान्यक्रम खालील निकषांच्या आधारावर लावण्यात यावे.

(i) संबंधित विषयामध्ये पदव्युत्तर डिग्री

(ii) मराठी भाषेमध्ये अस्खलित संभाषण कौशल्य

(iii) संशोधन, प्रशिक्षण/घटक संच निर्मिती/ संगणक शिक्षण मधील पात्रता किंवा अनुभव

(iv) प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळेत शिकवण्याचा अनुभव

(v) माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेत शिकवण्याचा अनुभव.

जी व्यक्ती शालेय शिक्षणाशी थेट संबंधित नाही त्यांच्यासाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात सर्वाधिक गांव/ अंगणवाडी आरोग्य उपकेंद्रात घडविण्यात आलेले बदल हा निकष एकमेव निकष राहील.

तथापि नव्याने ( ३ वर्षापेक्षा कमी सेवा ) नेमणूक झालेले इतर विभागातील अधिकाऱ्यांनी अर्ज केल्यास त्यांचा फक्त स्वप्रेरणा व ऊर्जा पाहन समितीस योग्य वाटल्यास निवड करता येईल.

(f) विद्या परिषदेत नियुक्तीचे अधिकार शासनास असल्यामुळे निवडीसाठी उपयुक्त उमेदवारांची संख्या रिक्त जागांपेक्षा जास्त असल्यास रिक्त जागांच्या २ पट पर्यंत नावे शासनास अनुसंशित करता येईल. अशी अनुसंशा करताना उमेदवारांचे प्राधान्यक्रम देण्यात येईल.

**५.२जिल्हास्तरीय निवड समिती :-**

**५.२.१ जिल्हास्तरीय निवड समितीची रचना :-**

प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय निवड समितीची स्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद |
| सहअध्यक्ष | - | जिल्ह्यांतील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी, |
| सदस्य सचिव | - | प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था ( DIECPD ) अर्थात DIET चे प्राचार्य |
| सदस्य | - | शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक |
| सदस्य | - | मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडून नामनिर्देशित एक गट शिक्षणाधिकारी |
| सदस्य | - | जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था ( DIECPD ) अर्थात DIET चे एक faculty |

**५.२.२ जिल्हा निवड समितीची कार्ये :-**

जिल्हा निवड समितीचे कार्यक्षेत्र व कार्यप्रक्रिया खालीलप्रमाणे राहील:

(a) ही समिती डायट मध्ये प्रतिनियुक्तीद्वारे भरण्यात येणारी पदे तसेच जिल्हा संसाधन समूहासाठी व्यक्तींची निवड करेल.
(b) निवड यादी आयुक्त, शिक्षण विभाग, पुणे यांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.
(c) निवडीचे निकष व बैठकीची वारंवारता राज्य निवड समितीसारखीच राहील.

**५.३ तालुकास्तरीय निवड समिती :-**

**५.३.१ तालुकास्तरीय निवड समितीची रचना -**

या समितीचे अध्यक्ष सहाय्यक गट शिक्षणाधिकारी ( नियुक्त झाल्यानंतर ) राहतील. या पदावर नियुक्ती होईपर्यंत गट शिक्षणाधिकारी या समितीचे अध्यक्ष राहतील. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील -

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | सहाय्यक गटशिक्षणाधिकारी (नव्याने निर्माण करण्यात येणा-या पदावर नियुक्तीनंतर) तोपर्यंत गटशिक्षणाधिकारी |
| सहअध्यक्ष | - | गटशिक्षणाधिकारी (सहाय्यक गटशिक्षणाधिकारी नियुक्तीनंतर) |
| सदस्य | - | गटामधील एक प्रतिनिधी |
| सदस्य | - | सहाय्यक गटशिक्षणाधिकारी अथवा सध्या गट शिक्षणाधिकारी नामनिर्देशित करतील असे त्या तालुक्यातील एक शिक्षण विस्तार अधिकारी |
| सदस्य | - | सहाय्यक गटशिक्षणाधिकारी अथवा सध्या गट शिक्षणाधिकारी नामनिर्देशित करतील असे त्या तालुक्यातील दोन केंद्रप्रमुख |

**५.३.२ समितीची कार्ये :-**

ही समिती फक्त गट संसाधन समूहातील व्यक्तींची निवड करेल. निवडीचे निकष व बैठकांची वारंवारता राज्य समिती सारखेच राहील. केंद्र स्तरावर कोणतीही निवड समिती राहणार नाही.

**६. जिल्हास्तर, तालुकास्तर व केंद्र स्तरावरील सक्षमीकरणाची व्यवस्था-**

**६.१. सक्षमीकरणाची जिल्हास्तरावरील व्यवस्था -**

**६.१.१ जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्थेची (DIECPD) संरचना:-**

जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्थेची रचना विद्यापरिषदेच्या रचनेप्रमाणे (विषयनिहाय) केली जाईल. त्यातले १-२ सदस्य हे समन्वय आणि मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडतील. रिक्त असलेली सर्व पदे लोकसेवा आयोगाकडून भरेपर्यंत प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. यापुढे राज्य लोकसेवा आयोगाकडून पदे भरताना विषय व्यवस्थेनुसार भरण्यात येतील. विषय व्यवस्थेनुसार डायट स्तरावर भाषा, गणित, विज्ञान, इंग्रजी, समावेशी शिक्षण आणि ICT या विषयासाठी प्रत्येकी ३ कार्यक्षम (एक नियमित सेवा व २ प्रतिनियुक्ती) उपक्रमशील तज्ञांची गरज भासणार आहे. सध्या मंजूर पदे यासाठी पुरेशी पडणार नसल्यामुळे प्रत्येक डायटमध्ये १२ अतिरिक्त शैक्षणिक पदे निर्माण करण्यात येतील व ज्या ठिकाणी उर्दू

भाषेसाठी काम करणे आवश्यक आहे, त्या ठिकाणी उर्दू भाषेसाठी अतिरिक्त २ पदे असे काही ठिकाणी १४ पदे प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील. ११ राजपत्रित पदे आणि अतिरिक्त १२ अथवा काही ठिकाणी १४ असे मिळून २३ अथवा २५ लोक प्रत्येक जिल्हास्तरीय संस्थेमध्ये कार्यान्वित राहतील. जिल्हास्तरीय संस्थेमधील लिपिकांची २ पदे व लघुलेखकाचे १ पद कमी करण्यात येतील. बाकींची ९ किंवा यथास्थिती ११ पदे इतर पदांच्या समायोजनातून निर्माण करण्यात येतील.

DIECPD मध्ये प्राचार्याचे पद रिक्त असल्यास तेथील पदस्थापित जेष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता किंवा त्याच जिल्ह्यात पदस्थापित शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक किंवा निरंतर) यांच्या मधून अर्ज मागवून सर्वात कार्यक्षम व परिणामकारक अधिकाऱ्यांची निवड राज्यस्तरीय समिती द्वारे करून अतिरीक्त प्रभार देण्यात येईल.

**६.१.२ जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्थेची कार्ये -**

(१) जिल्हास्तरीय संस्था यापूर्वी करीत असलेल्या कार्यासह खालील कामेसुध्दा पार पाडतील.

- केंद्र प्रमुख आणि तालुकास्तरीय साधन व्यक्ती यांना क्षमता वृद्धीसाठी संधी उपलब्ध करून देईल.
- शिक्षक, केंद्रप्रमुख, तालुका स्तरीय साधन व्यक्ती यांना संदर्भ साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी सहाय्य करेल.
- राज्यस्तरीय मुक्त दूरस्थ अध्ययनासाठी संपर्क केंद्राचे संचलन करण्यासाठी मदत करेल.
- जिल्हास्तरीय संस्थेमध्ये साधन केंद्र विकसित करेल.
- विषयनिहाय चर्चासत्रांचे नियोजन व आयोजन करेल.
- व्यवस्थापन शास्त्रानुसार शिक्षकांच्या गरजा निश्चित करण्यासाठी संशोधन उपक्रम राबवेल.
- शाळास्तरावरील समस्या जाणून घेण्यासाठी शाळांना भेटी देईल. त्याचा हेतू शाळांची तपासणी करणे नसून शाळास्तरावरील विविध समस्या जाणून घेणे हा आहे.

(२) जिल्हास्तरीय शैक्षणिक व्यावसायिक विकास संस्था प्रमुखांचे खालील बाबीं संदर्भात सक्षमीकरण करेल.

- शिक्षकांच्या गरजा निश्चित करण्यासाठी सक्षम करणे. केंद्र प्रमुखांनी जिल्हास्तरीय संस्थेकडे त्याप्रमाणे मागणी करावी.
- विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीचे विश्लेषण करण्यास शिक्षकांना मार्गदर्शन करणेसाठी सक्षम करणे.
- वर्गकार्याचे निरीक्षण आणि प्रत्याभरण करण्यासाठी सक्षम करणे.
- अध्यापन पध्दतीतील बदलांबाबत सहाय्य, प्रोत्साहन व संसाधनांची उपलब्धता करून घेण्यासाठी सक्षम करणे..
- **केंद्र संमेलनांना प्रोत्साहन** - संकलित माहिती व आधारित विषयपत्रिका तयार

करणे (शिक्षकांच्या गरजा, वर्गकार्य निरीक्षणातील नोंदी), शिक्षकांमधील संवाद, चांगल्या पद्धतींचा प्रसार, इत्यादी; क्षमता समृद्धी कार्यशाळेतील प्रतिसादांचा पाठपुरावा यासाठी सक्षम करणे.

- **शाळेचे शैक्षणिक नियोजन** - वयानुरूप प्रवेश, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेतील प्रवेश यासह शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनाबाबत स्वत: काढलेले निष्कर्ष याबाबत केंद्रप्रमुखांनी करावयाची निरीक्षणे

**६.२ सक्षमीकरणाची तालुकास्तरावरील व्यवस्था-**

तालुका हा जिल्ह्याच्या तुलनेत अधिक एकसंध असतो. तसेच शाळांपर्यंत संपर्क साधणे तुलनेने सोपे असते. साधन व्यक्ती असलेले गट साधन केंद्र शिक्षकांसाठी अपेक्षित आहे. ज्यामध्ये शिक्षकांसाठी प्रशिक्षण, बैठका, चर्चासत्र, वाचनालय, आंतरजाल इत्यादी सुविधा असतील.

**६.२.१ गट साधन केंद्राची रचना** -

गट साधन केंद्राचे प्रमुख सहाय्यक गट शिक्षणाधिकारी राहतील. जिल्ह्यात उपलब्ध शिक्षण विस्तार अधिकाऱ्यामधून अर्ज मागवून जिल्हा निवड समितीद्वारे त्यांची निवड करण्यात येईल. व आयुक्त शिक्षण यांची मान्यता मिळाल्यावर त्यांची पदस्थापना करण्यात येईल. ही नियुक्ती एकावेळी ५ वर्षांकरीता राहील.

गट साधन केंद्रात भाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान,सामाजिक शास्त्रे, ICT या विषयासाठी प्रत्येकी ३ अशा १८ व्यक्ती व समावेशी शिक्षणाचे ७ धरुन एकूण २५ व्यक्ती कार्य करतील. या १८ व्यक्तींमध्ये त्या गट साधन केंद्रात सध्या कार्यरत ६ विषय साधन व्यक्ती, २ विशेष साधन व्यक्ती व ५ मोबाईल शिक्षक यांचा समावेश राहील. गट साधन केंद्राचे प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी या दर्जाचे अधिकारी राहतील. इतर शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या तुलनेत हे पद गुणवत्तेसाठी ओळखले जावे म्हणून या पदास “सहाय्यक गट शिक्षणाधिकारी” असे संबोधले जाईल. तालुक्याच्या गुणवत्तेची जबाबदारी गट शिक्षणाधिकारी यांची असल्याने गट साधन केंद्र त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करेल.

**६.२.२ गट साधन केंद्राची कार्ये** -

- शिक्षकांनी व्यक्त केलेल्या गरजा व स्वत: शोधलेल्या स्थानिक गरजांवर आधारित संपर्क वर्ग व प्रशिक्षण वर्ग आयोजित करणे
- केंद्र बैठकांना उपस्थित राहणे
- शाळा स्तरावर शिक्षकांना सहाय्य करण्यासाठी (आणि स्वतःच्या माहितीसाठी) शाळांना भेटी देणे
- शिक्षकांना अध्ययन अध्यापन साहित्य तयार करण्यासाठी मदत करणे
- केंद्र प्रमुख तथा केंद्रस्तरीय संसाधन समूह सोबत तसेच जि.शि. व प्र. संस्थेबरोबर संपर्क ठेवणे.
- शिक्षकांच्या व्यावसायीक विकासासाठी वार्षिक योजना आखणे
- गट साधन केंद्रातील सदस्यांना जबाबदारीचे वाटप करणे.

### ६.३ सक्षमीकरणाची केंद्र स्तरावरील व्यवस्था -

केंद्र प्रमुखाची भूमिका ही प्रामुख्याने शैक्षणिक कामे करण्याची असते तरी प्रत्यक्षात त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय कामे करावी लागत आहेत. यापुढे त्यांनी शक्यतो प्रशासकीय कामे करु नयेत. त्यांनी खालील कामे प्राधान्याने करावीत.

#### ६.३.१ शाळा व शिक्षकांशी निगडित कार्य -

केंद्र प्रमुखांनी खालील ४ प्रकारची शैक्षणिक कामे करणे अपेक्षित आहे.

- शाळा भेटी आणि वर्ग निरीक्षण
- केंद्र संमेलने आयोजित करणे
- समूह साधन केंद्र कार्यरत करणे
- शाळेच्या शैक्षणिक नियोजनासाठी मदत होईल अशा तऱ्हेने सांख्यिकीय माहितीचे व्यवस्थापन करणे.

#### ६.३.२ मुख्याध्यापकांशी निगडीत कार्य -

केंद्र प्रमुखाचा शाळेच्या मुख्याध्यापकाशी (जेथे आहे तेथे) सुसंवाद असणे आवश्यक आहे. शाळेतील शिक्षकांची मुख्याध्यापकांकडून मार्गदर्शनाची अपेक्षा असते आणि अशा वेळी मुख्याध्यापकाला केंद्र प्रमुखाची गरज भासू शकते. ज्या शाळा लहान आहेत आणि दोनच शिक्षक आहेत त्या ठिकाणी केंद्र प्रमुखाला मुख्याध्यापकाची भूमिका घेणे आवश्यक ठरते.

#### ६.३.३ इतर संस्था आणि व्यक्तींशी समन्वय -

- गट साधन केंद्रासोबत समन्वय, सुसंवाद आणि संपर्क ठेवणे.
- शिक्षकांच्या गरजांची काळजीपूर्वक पडताळणी करून गट साधन केंद्राला सादर करणे. या गरजा दोन प्रकारच्या असू शकतील. तातडीच्या गरजा, कदाचित कमतरता/उणीवा आणि दीर्घकालीन गरजा. (शिक्षकांशी केलेल्या चर्चेनुसार)
- केंद्र प्रमुखाला शिक्षकांच्या गरजांचे स्थानिक स्तरावर निराकरण करता नाही आले तर तो गट साधन केंद्रातील लोकांशी दूरध्वनी, व्हॉट्स ॲप, इ मेल द्वारे संपर्क साधेल.
- चांगल्या पद्धती, नवनवीन कल्पना, सृजनशील अध्ययन अध्यापन साहित्य इत्यादींचा कोष गट साधन केंद्रावर तयार करण्यास मदत करणे.
- जवळच्या इतर केंद्र प्रमुखांशी संसाधनांच्या उपलब्धतेबाबत संपर्कात राहील. आपल्या केंद्रातील शिक्षकांच्या व शाळांच्या गरजा लक्षात घेऊन इतर केंद्रामध्ये उपलब्ध साहित्याचा वापर करून त्यांची पूर्तता करणे.

### ७. संसाधन समूहाची संकल्पना :-

काही लोक आपल्या क्षेत्रात यशस्वीरित्या कार्य करीत असतात. अशा व्यक्ती स्वत:च्या वर्तमान कार्यात खूप समाधानी असतात. म्हणून ते वर्तमान कार्य न सोडता मार्गदर्शक म्हणून काम करण्यास तयार असतात. काही वेळा कौटुंबिक कारणामुळे या व्यक्तींना शासनाकडे उपलब्ध पद धारण करणे शक्य होत नाही. तथापि, त्यांचा ज्ञान आणि अनुभव दांडगा असतो म्हणून त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ करुन घेणे समाजासाठी उपयुक्त असते. काही वेळा

मान्य पदांची मर्यादा असल्यामुळे सर्व प्रकारच्या तज्ञांसाठी पदे उपलब्ध होत नाहीत.

या प्रकारच्या व्यक्तींच्या समूहाला संसाधन समूह म्हणून संबोधण्यात येत आहे. हा समूह विविध स्तरावर कायमस्वरुपी कार्यरत असेल. शिक्षक शिक्षणाच्या सक्षमीकरणासाठी आयोजित करावयाच्या कार्यशाळा, परिसंवाद, प्रशिक्षणे यासाठी जशी आवश्यकता भासेल तसे संसाधन समूहातील तज्ञांना पाचारण करण्यात येईल. या संसाधन समुहात खालील व्यक्तींचा समावेश असेल -

(i) शिक्षक, शैक्षणिक संस्थातील लोक, प्रशासनातील लोक,
(ii) राज्य व राष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात यशस्वी झालेल्या व्यक्ती,
(iii) शिक्षण संशोधनात तसेच ज्ञानाच्या क्षेत्रात मूलभूत योगदान देणाऱ्या व्यक्ती,
(iv) नेतृत्व, कला, क्रीडा व कार्यानुभव क्षेत्रात समृध्द व अनुभवक्षम व्यक्ती,
(v) समावेशी शिक्षणात यशस्वी व्यक्ती असतील.

या व्यक्तींना शासन ठरवेल त्याप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील. मानधन साधारणपणे दर दिवसाच्या हिशोबात ठरविण्यात येईल. मानधनाबाबत राज्य शासन नवीन धोरण ठरवेपर्यंत विविध संस्थांमध्ये प्रचलित मानधनाचे दर संसाधन गटातील सदस्यांना लागू राहतील. अशाप्रकारे जिल्हा स्तरावर, गट स्तरावर व केंद्र स्तरावर संसाधन समूह कार्यरत राहतील.

**राज्य संसाधन समूह -**

राज्यस्तरीय निवड समितीमार्फत राज्य संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. राज्य संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करण्यात येईल.

**जिल्हा संसाधन समूह -**

जिल्हा निवड समितीमार्फत जिल्हा संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सध्याचे डाएट) या ठिकाणी जिल्हा संसाधन समूह एकत्रित येईल. जिल्हा संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करता येईल.

**गट संसाधन समूह -**

तालुका निवड समितीमार्फत गट संसाधन समूहाची निवड करण्यात येईल. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (सध्याचे डाएट) या ठिकाणी अथवा गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गट संसाधन समूह एकत्रित येईल. जिल्हा संसाधन समूहामधील एका व्यक्तीस महिन्यातून साधारणपणे पाच दिवस पाचारण करता येईल.

**केंद्र संसाधन समूह -**

केंद्र संसाधन समुहात भाषा, इंग्रजी, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र व ICT या सहा विषयांसाठी प्रत्येकी २ असे उपक्रमशील शिक्षक ज्यांना या विषयातील तज्ञता अवगत आहे व ज्यांनी स्वत:ची वर्ग आणि शाळा ज्यांनी प्रगत केली आहे यांची निवड करण्यात येईल. असे १२ शिक्षक सर्वसाधारणपणे महिन्यातून २ दिवस केंद्र संसाधन समुहात कार्य करतील. ते इतर शिक्षकांना समृध्द आणि सक्षम करतील. या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत सहपत्रामध्ये दिल्याप्रमाणे सर्व २२ घटक किंवा त्यापेक्षा अधिक मार्ग सुचल्यास त्या सर्वांचा विविध वेळी उपयोग केला

जाईल. त्यामध्ये प्रत्यक्ष अध्ययन अध्यापन अनुभूतिस व “मागेल तेव्हा मागेल तसे”प्रशिक्षणास प्राधान्य दिले जाईल. तसेच, केंद्र संमेलनाचे ठिकाण त्याच केंद्रातील कोणतेही गाव किंवा शाळा अथवा गटांतर्गत, जिल्हांतर्गत किंवा राज्यातील कोणतेही गाव किंवा शाळा असू शकेल. उद्दिष्ट मात्र स्पष्ट असेल मुलांना आनंदाने शिकण्यासाठी मदत करणे.

**केंद्र संसाधन समूहाची रचना -**

१. या पातळीवर सहाय्यक गटशिक्षण अधिकारी शिवाय अन्य कोणतेही पूर्णवेळ पद निर्माण करण्यात येणार नाही. प्रत्येक विषयासाठी २ व्यक्ती “पाहिजे तेव्हा” या तत्वावर कार्य करतील.

२. एका महिन्यात साधारणपणे तीन दिवस पाचारण करण्यात येईल.

केंद्रस्तरावरील संसाधन समुहातील व्यक्तींची निवड तालुकास्तरावर होऊ शकते. तथापि, प्रत्येक तालुक्यात केंद्राची संख्या अधिक असल्यामुळे केंद्रस्तरावरील सर्व व्यक्तींची निवड तालुकास्तरावर होईलच असे नाही. तथापि, काही व्यक्तींची निवड दोनही स्तरावर होऊ शकते. सदर व्यवस्थेस या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. या व्यक्ती प्रत्येक महिन्यात पाच दिवस शाळेतून बाहेर राहण्याची शक्यता आहे. अशा व्यक्ती शाळेत नसल्यावर सुध्दा मुलांच्या स्वशिक्षणाची व्यवस्था करु शकतात असे गृहित धरण्यात येत आहे. स्वशिक्षणाची व्यवस्था न करु शकणा-या व्यक्तींची एकापेक्षा अधिक स्तरावर निवड करण्यात येवू नये. काही व्यक्तिंची एकापेक्षा अधिकस्तरावर निवड केली गेल्यास त्यांच्या शाळेच्या अनुपस्थितीच्या काळात पर्यायी व्यवस्था सुध्दा करता येणे शक्य आहे. दोन्हीपैकी कोणताही एक पर्याय आवश्यक राहील.

**८. <u>मूल्यमापन</u> :-**

प्रत्येक संस्थेचे तसेच त्यामधील कार्यरत व्यक्तींचे मूल्यमापन राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण, राज्यस्तरीय संपादणूक सर्वेक्षण, राज्यस्तरीय पायाभूत व संकलीत चाचण्या, त्रयस्थ संस्था मूल्यमापन इत्यादी मधून प्राप्त मूलांचे संपादणूक पातळीच्या आधारावर करण्यात येईल. त्यासाठी वेगळयाने विस्तृत दिशा निर्देश देण्यात येईल.

पाच वर्षांकरीता पदस्थापित करण्यात आलेल्या व्यक्तींची निष्पत्ती कोणत्याही वर्षाच्या मूल्यमापनात अपेक्षेपेक्षा फारच कमी असल्यास राज्यस्तरीय निवड समितीच्या शिफारशीनंतर त्यांना इतरत्र पदस्थापित करण्यात येईल व अशा पद्धतीने रिक्त झालेल्या पदावर पुन्हा निवड प्रक्रिया करण्यात येईल.

वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दिनांक २.६.२०१५ अन्वये विभागांतर्गत पदांचे समायोजन करून घेण्याचे अधिकार संबंधित विभागास प्रदान करण्यात आले आहे. त्या अधिकाराचा वापर करून हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१८१७०६४६५२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( नंद कुमार )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीसाठी सादर**

१. मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन, यांचे प्रधान सचिव
२. मा. मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. मा. मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र शासन
४. मंत्रालयीन विभागातील सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव यांचे स्वीय सहायक

**प्रति,**

१. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
३. सर्व संचालक, शिक्षण विभाग
४. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
५. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्व व्यावसायिक विकास संस्था (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था)
६. सर्व शिक्षणाधिकारी प्राथमिक/माध्यमिक जिल्हा परिषद

सहसंचालक, (प्रशासन अंदाज व नियोजन) आयुक्त (शिक्षण) कार्यालय यांनी हा शासन निर्णय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा.